RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

५ गुरुवार फेब्रुवारी २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २५१

✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

## मुख्याध्यापक व अधीक्षकांचे निलंबन



■ गडचिरोली : भामरागड तालुक्यातील लाहेरी येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत घडलेल्या विषबाधा प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रशासनाने कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत शाळेचे मुख्याध्यापक डी. जी. रापंजी आणि अधीक्षक एम. एम. पाटील यांना तडकाफडकी निलंबित केले आहे. तसेच, अधिक्षिका व पाच चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची एक वर्षाची वेतनवाढ रोखण्याचे आदेश भामरागडचे प्रकल्प अधिकारी अमर राऊत यांनी दिले

## पोलिसांनी लावला हत्याकांडचा छडा

**▸विदर्भ केसरी। गडचिरोली:**

अनैतिक संबंधांच्या आड येणाऱ्या पतीचा अत्यंत क्रूरपणे काटा काढून त्याचा मृतदेह जंगलात पुरल्याची धक्कादायक घटना कोरची परिसरात उघडकीस आली आहे. कोणतेही धागेदोरे उपलब्ध नसताना, केवळ गुप्त माहिती व सूक्ष्म तपासाच्या आधारे कोरची पोलिसांनी ७२ तासांच्या आत या हत्याकांडाचा छडा लावत पाच आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. यामध्ये मृताच्या पत्नीसह तिच्या प्रियकराचा समावेश आहे. ३१ जानेवारी २०२५ रोजी कोरची पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोगाटोला गावानजीकच्या जंगलात एका अनोळखी व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. अंदाजे ३० ते ३५ वयोगटातील या तरुणाची हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जमिनीत पुरण्यात आला होता. मृतदेहाचे शवविच्छेदन केले असता, डोक्यावर आणि मानेवर धारदार शस्त्राने वार करून त्याची निर्घृण हत्या केल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. मृतदेहाचा चेहरा पूर्णतः विद्रूप झाल्याने ओळख पटवणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. घटनास्थळी सापडलेली एक रिकामी गोणी आणि मृतदेह पुरण्यासाठी वापरण्यात आलेले खोदकाम साहित्य यावरून पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. गोपनीय तपासादरम्यान २० जानेवारी रोजी जांभुळखेडा येथील काही तरुण खोदकामाचे साहित्य घेऊन या परिसरात फिरत होते. या माहितीवरून पोलिसांनी शालू पठाण याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान संशय बळावल्याने पोलिसी खाक्या दाखवताच आरोपीने सर्व कबूल केले व या हत्याकांडाचा उलगडा झाला.

# शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही

## कर्जमाफीचा मोठा दिलासा देणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**▸विदर्भ केसरी। जेवळी :**



सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार अन्नदात्या शेतकऱ्यांचा असून, आम्ही शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. आम्ही घेणारे नाही, तर देणारे आहोत. महायुतीच्या वचनाम्यातील आश्वासनाप्रमाणे कर्जमाफीसाठी समिती नेमण्यात आली असून, समितीचा अहवाल येताच निर्णय घेऊन शेतकऱ्यांना कर्जमाफीचा मोठा दिलासा देणार आहोत, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. जेवळी (ता. लोहारा) येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचार सभेत ते बोलत होते.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीनिमित्त उमरगा व लोहारा तालुक्यातील शिवसेना, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्ष महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी (ता. ४) जेवळी येथील श्री बसवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात जाहीर सभा पार पडली. या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक, संपर्कप्रमुख राजेंद्र साळवी, माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाप्रमुख मोहन पणुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची वाटचाल महासत्तेकडे सुरू आहे. राज्यातही महायुती सरकारच्या माध्यमातून भरीव विकास साधला जात आहे. सरकारने अनेक प्रकल्पांना चालना दिली असून, मोठ्या प्रमाणात लोकाभिमुख कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. महिलांसाठी धाडसाने राबवण्यात येत असलेली 'लाडकी बहीण' योजना, लखपती दीदी योजना, एसटी तिकीट दरात सवलत आणि मुलींना मोफत उच्च शिक्षण यांसारख्या योजनांमुळे महिलांना मोठा आधार मिळाला आहे.

यावेळी नगराध्यक्ष किरण गायकवाड, जिल्हाप्रमुख सुरज साळुंखे, मुरूम कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बसवराज कारभारी, तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाप्रमुख सुनील साळुंखे व उमरगा व लोहारा तालुक्यातील महायुतीचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> ■ त्याचप्रमाणे शेतकऱ्यांसाठी मोफत उपचार, शेतकरी सन्मान योजना आणि पीकविमा योजनेच्या माध्यमातून बळीराजाला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. हे डबल इंजिनचे सरकार असून राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे येत आहेत. पुढील काळात ५० लाख बेरोजगारांना नोकऱ्या देण्याचा सरकारचा संकल्प आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीची ही निवडणूक आपल्या गावचा, जिल्ह्याचा विकास आणि तुमच्या मुलाबाळांच्या भवितव्याची निवडणूक असून विकासाला पाठिंबा द्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## देशद्रोहाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

उमरखेड येथील नगरपालिकेच्या अब्दुल गफूर शाह उर्दू शाळा क्रमांक २ मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान देशविरोधी गीतावर विद्यार्थ्यांकडून नृत्य करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणातील दोषी शिक्षक आणि संबंधित पदाधिकाऱ्यांवर तातडीने देशद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी भारतीय जनता पार्टीने केली आहे. भाजप जिल्हा सरचिटणीस महेश काळेश्वरकर यांनी आज बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

या शाळेत २६ जानेवारीच्या निमित्ताने शनिवार, ३१ जानेवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात 'ए मर्द-ए-मुजाहिद तेरी यलगार कहाँ है' या गीतावर विद्यार्थ्यांकडून नृत्य करून घेण्यात आले. हे गीत १९६५ च्या भारत-पाक युद्धादरम्यान पाकिस्तानने आपल्या सैनिकांना आणि नागरिकांना भारताविरुद्ध भडकवण्यासाठी वापरले होते, असा आरोप भाजपने केला आहे. हे गीत आजही पाकिस्तानात लष्करी आणि राष्ट्रीय समारंभात गायले जाते.

भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारे आणि चिथावणीखोर शब्द असलेल्या या गीतावर भारतात बंदी असल्याचेही काळेश्वरकर यांनी सांगितले. निरागस विद्यार्थ्यांच्या मनावर देशविरोधी विचार रुजविण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न शाळेकडून करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. शासकीय शाळेत अशा प्रकारचे धार्मिक आणि प्रक्षोभक गीत वाजवणे हे संविधानाच्या अनुच्छेद २८ चे उल्लंघन आहे. या गीताद्वारे तलवार उचलण्याची भाषा करून लोकांना उग्र आंदोलनासाठी प्रेरित केले जात असल्याचा आरोप काळेश्वरकर यांनी केला.

या प्रकरणी भाजप नगरसेवक गोपाल कलाने यांनी सोमवारी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, कार्यक्रमावेळी नगरपालिकेचे पदाधिकारी, नगराध्यक्ष आणि शिक्षण सभापती उपस्थित होते. हे गीत वाजत असताना त्यांनी ते थांबवण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही, याचा अर्थ त्यांचा या कृत्याला अप्रत्यक्ष पाठिंबा होता, असा आरोप भाजपने केला आहे.

## सहयोग बंगल्यात पवार कुटुंब एकत्र!

### शरद पवारांकडून थरथरत्या हातांनी अजित पवारांच्या प्रतिमेला मानवंदना

**▸विदर्भ केसरी।**



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झालं. बारामती येथे विमान लँड होत असताना विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या निधनानंतर संपूर्ण राज्यातून हळहळ व्यक्त करण्यात आली. अजित पवारांचं अपघाती निधन झालं असलं तरीही आजही महाराष्ट्रातील जनतेला यावर विश्वास बसत नाहीय. दरम्यान, अजित पवारांचे काका आणि देशाचे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी आज अजित पवारांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. या भेटीदरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अजित पवारांची बंधू श्रीनिवास पवार, भगिनी तसेच आमदार रोहित पवार, पार्थ पवार, जय पवार आणि प्रतिभा पवार उपस्थित होते. संपूर्ण पवार कुटुंबाने आज सांत्वन भेटीला आलेल्या कार्यकर्त्यांचीही आज भेट घेतली. आज सायंकाळपासून सहयोग बंगल्यावर पवार कुटुंब एकत्र आलं आहे.

शरद पवार आज खूप वर्षांनी सहयोग सोसायटी येथे दाखल झाले. अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या शपथविधीनंतर शरद पवारांनी पहिल्यांदाच सुनेत्रा पवारांची भेट घेतली. अजित पवारांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासंदर्भात मोठी चर्चा सुरू आहे.

## राज्यातील उपकेंद्र, पीएचसीतही महात्मा फुले योजना

### आता बाह्यरुग्ण विभागातील उपचारही मिळतील मोफत

**▸विदर्भ केसरी। पुणे :**

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (एमजेपीजेएवाय) ही राज्य शासनाची व खासगी तसेच सरकारी रुग्णालयात मोफत उपचार देणारी योजना आहे. आतापर्यंत या योजनेत रुग्णालयात दाखल राहून उपचार घेत असलेल्या रुग्णांना मोफत उपचार मिळत होते. मात्र, आता ही योजना बाह्यरुग्ण विभागाची सेवा पुरविणाऱ्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे सर्वच उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नागरिकांना योजनेअंतर्गत नव्याने समाविष्ट असलेल्या सुमारे २ हजारांहून अधिक आजारांवरील उपचारांचा आर्थिक लाभ घेता येणार आहे.

ही योजना महाराष्ट्रातील रहिवाशांसाठी लागू आहे. याअंतर्गत आतापर्यंत रुग्णालयात दाखल झालेल्या व ज्यांच्यावर शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय उपचार करण्यात येतात. आतापर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र यामध्ये योजना लागू नव्हती. मात्र, आता ती लागू करण्याचा निर्णय योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी घेतला आहे.

> ■ ....... "नुकत्याच झालेल्या बैठकीत सर्व महापालिका, जिल्हा परिषद, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व आरोग्य केंद्र आणि शहरी आरोग्य केंद्र यांचा याअंतर्गत समावेश करण्याचे निर्देश देण्यात आले. या योजनेत प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य उपचारांचे संरक्षण दिले जाते. म्हणजेच कुटुंबातील एक किंवा अधिक सदस्य हा लाभ घेऊ शकतात. या योजनेत ३४ वैद्यकीय शाखांमधील शस्त्रक्रिया व उपचारांचा समावेश आहे. आधीपासूनच अस्तित्वात असलेले आजारही यामध्ये दिले जातात. राज्यातील सर्वच नागरिक या योजनेत पात्र आहेत. ते राज्यातील कोणत्याही सरकारी किंवा खासगी संलग्न रुग्णालयात, योजनेच्या संकेतस्थळावर दिलेल्या रुग्णालयांमध्ये आगामी रक्कम न भरता (कॅशलेस) उपचार घेऊ शकतो."
>
> ■ – अण्णासाहेब चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी, 'एमजेपीजेएवाय'

### उपचारांची संख्या वाढवली...

■ राज्यात सध्या शहरी व ग्रामीण भागात मिळून २ हजार ६०० हून अधिक प्राथमिक आरोग्य केंद्र आणि १० हजारांहून अधिक आरोग्य उप केंद्रे असून, ही सर्व केंद्रे योजने अंतर्गत आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सध्या योजनेत १ हजार ३०० उपचारांचा समावेश आहे. येत्या आठवड्यात हा आकडा वाढवून दोन हजार ते २३०० पर्यंत नेण्यात येणार आहे.

## ५३० ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक राज! आता अधिकारीच कारभारी

**▸विदर्भ केसरी। बुलढाणा :**

ग्रामीण भागाचे बरे वाईट भवितव्य घडविणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कारभार आता पूर्णपणे अधिकाऱ्यांच्या हाती जाणार आहे! याचे कारण जिल्हा परिषद, पंचायत समित्यांप्रमाणेच आता ग्राम पंचायतींमध्येही प्रशासक राजवट येणार आहे. जिल्ह्यातील तब्बल ५३० ग्रामपंचायतींचा कारभार सरपंच व सदस्यांऐवजी अधिकाऱ्यांच्या हाती राहणार आहे. रखडलेल्या निवडणुका लक्षात घेता ग्रामपंचायतींमधील प्रशासक राज दीर्घ काळ राहणार, अशी चिन्हे आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील ५२५ ग्राम पंचायत ची मुदत चालू फेब्रुवारी महिन्यात संपणार आहे. बुलढाणा जिल्हा परिषद व १३ पंचायत समित्यांची निवडणूक  ओबीसी आरक्षण मुद्यावरून पुढे ढकलण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर या निवडणुका कधी होणार हे ठरणार आहे. इतर जिल्हा परिषदाच्या निवडणुकाची धामधूम सध्या सुरु आहे. यामुळे नजिकच्या काळात बुलढाणा जिल्हा परिषदची निवडणूक लागणार आहे. यामुळे चालू महिन्यात मुदत संपणाऱ्या ५२५ ग्राम पंचायतच्या निवडणुका लांबणीवर पडणार आहे.

यामध्ये बुलढाणा तालुक्यातील ५१, चिखली ६०, देऊळगाव राजा २६, सिंदखेड राजा ४३, लोणार १६, मेहकर ४०, खामगाव ७१, शेगाव ३४, जळगाव २४, संग्रामपूर २७, मलकापूर ३३, नांदुरा ४८ आणि मोताळा तालुक्यातील ५२ ग्राम पंचायतींचा समावेश आहे. या ग्राम पंचायतचे नुकतेच विघटन झाल्याने फेब्रुवारीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतची संख्या आता ५३० झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक कार्यक्रम जाहीर न झाल्याने आता या ग्राम पंचायती मध्ये प्रशासक नेमण्यात येणार आहे.

## मुलगा–पत्नीच निघाले मारेकरी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



पैनगंगेच्या प्रवाहात पिवळ्या फारीत बांधून फेकलेला कुजलेला मृतदेह, ओळख शून्य आणि पुराव्यांचा अभाव—तरीही महिन्याभराच्या मेहनतीनंतर यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेने खुनाचा थरार उघड केला. मृतक कोण, का मारला, कुणी मारला—या तिन्ही प्रश्नांची उकल करत पोलिसांनी घरातच रचलेला कट उघडकीस आणला.

प्रदीप मारोती डुकरे (वय २५) आणि पार्वतीबाई मारोती डुकरे (वय ५५), रा. जलधरा, पो. इस्लापूर, ता. किनवट, जि. नांदेड—हेच आरोपी असल्याचे तपासातून स्पष्ट झाले. मृतक मारोती गंगाराम डुकरे असल्याची ओळख पटली.

९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.४५ वाजता मौजे मुरली शिवारातील पैनगंगा नदी पात्रात, सहस्त्रकुंड धबधबा कोल्हापुरी बंधाऱ्याजवळ पिवळ्या फारीत बांधलेला अनोळखी पुरुषाचा मृतदेह सापडला होता. प्रेत अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने ओळख अशक्यप्राय होती. बिटरगाव पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू झाला.

पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने चार पथके तयार केली. घटनास्थळाची बारकाईने पाहणी झाली; मात्र कपड्यांखेरीज काहीच हाती लागले नाही. मग तपासाचा पसारा ५० किलोमीटरपर्यंत वाढवून पोलीस पाटील, बेपत्ता नोंदी आणि गोपनीय माहिती यांचा मेळ घालण्यात आला. याच दरम्यान जलधरा (ता. किनवट) येथील मारोती गंगाराम डुकरे बेपत्ता असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली—आणि संशयाची सुई घराकडे वळली.

घरात चौकशीदरम्यान मुलगा व पत्नीच्या हालचाली संशयास्पद आढळल्या. कौशल्यपूर्ण चौकशीत दोघांनीही कबुली दिली. दारूच्या सवयीमुळे त्रास होत असल्याने वैतागून त्यांनी मारोती गंगाराम डुकरे यांचा जीव घेतला आणि पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने मृतदेह पिवळ्या फारीत बांधून सहस्त्रकुंड बंधाऱ्यात टाकल्याचे त्यांनी मान्य केले. आरोपींना ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी बिटरगाव पोलीस ठाण्याकडे सुपूर्द करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक अशोक बोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ व बिटरगाव पोलीस ठाण्याच्या पथकांनी संयुक्तपणे यशस्वी केली.

## तरुणीच्या पोटात १४ किलोचा ट्युमर

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

नागपुरातील लता मंगेशकर हॉस्पिटल, डिगडोह येथील डॉक्टरांनी एका २२ वर्षीय तरुणीची वैद्यकीय तपासणी केली. तिच्या पोटात १४ किलोचा ट्युमर आढळला. हे बघून डॉक्टर थक्क झाले. त्यानंतर डॉक्टरांनी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया केली. त्यानंतर काय झाले, याबाबत आपण जाणून घेऊ या. नागपुरातील एका २२ वर्षीय मुलीला पोटात प्रचंड त्रास होत होता. विविध डॉक्टरांकडून उपचार घेतल्यावर ती लता मंगेशकर हॉस्पिटल, डिगडोह हिल्स, हिंगणा रोड येथे गेली. विविध तपासणीत तिला अंडाशयाच्या मोठ्या ट्यूमरने ग्रासल्याचे निदर्शनास आले

## रस्ते अपघात ५० टक्क्यांनी कमी होणार?

### राज्यसभेत गडकरी यांनी दिली महत्त्वपूर्ण माहिती

**▸विदर्भ केसरी।**



रस्ते अपघात रोखण्यासाठी केंद्र सरकार अनेक मोठी पावले उचलत आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने आयआयटी मद्रास येथे रस्ते सुरक्षेसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन केले आहे. हे केंद्र शैक्षणिक संस्था, उद्योग आणि सरकार यांच्यात सहकार्य वाढवून रस्ते सुरक्षेतील सर्वोत्तम पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी काम करत आहे. २०३० पर्यंत रस्ते अपघातातील मृत्यू ५० टक्यांनी कमी करणे आणि २०४० पर्यंत शून्य मृत्यू साध्य करणे हे त्याचे ध्येय आहे. यासाठी सरकारने फॅटिलिटी कॉरिडॉर ओळखले असून यामध्ये ब्लॅक स्पॉट्स दुरुस्त करणे, ट्रॅफिंग कॅल्मिंग, साइनेज इत्यादी आदी सुधारणा केल्याच जात असल्याची माहिती, केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यसभेत दिली.

याशिवाय अपघात कमी करण्यासाठी, प्रगत वाहतूक व्यवस्थापन प्रणाली स्थापित करण्याची सरकारची योजना आहे. यामध्ये एआय- व्हिडिओ इंसिडेंट डिटेक्शन, ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन कॅमेरा आणि सर्विलान्स कॅमेरे यांचा समावेश आहे. या प्रणाली अपघातांची लवकर माहिती मिळवतात, उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करतात आणि रिअल-टाइम प्रतिसाद देखील देतात.

दिल्ली-मेरठ आणि ट्रान्स-हरियाणा महामार्गांसारख्या अनेक जास्त रहदारी असलेल्या राष्ट्रीय महामार्गांवर आणि द्रुतगती महामार्गांवर एटीएमएस आधीच बसवलेले आहेत आणि आता ते सर्व 4-लेन राष्ट्रीय महामार्गांवरही विस्तारित केले जातील.

> ■ याशिवाय, वाहने अधिक सुरक्षित करण्यासाठी, मध्यम आणि जड वाहनांसाठी (M2, M3, N1, N2, N3 आणि क्वाड्रिसायकल) अक्टिव्ह फिचर्स अनिवार्य केले आहेत. यामध्ये अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम, एंड्युरन्स ब्रेकिंग, व्हिकल स्टेबिलिटी फंक्शन, लेन डिपार्चर वॉर्निंग, ड्रायव्हरची ड्राउजिनेस आणि अटेंशन वॉर्निंग, ब्लाइंड स्पॉट इन्फार्मेशन, मूव्हिंग ऑफ इन्फार्मेशन सिस्टम आदींचा समावेश आहे. हे नवीन मॉडेल्ससाठी १ जानेवारी २०२७ पासून आणि विद्यमान मॉडेल्ससाठी १ ऑक्टोबर २०२७ आणि जानेवारी २०२८ पासून लागू होईल.

## पुणे-बंगळूर महामार्गावर अवजड वाहतूक ठप्प

**▸विदर्भ केसरी। पुणे :**




पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघातामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून, त्याचा फटका पुणे- बंगळूर महामार्गालाही बसला. परिणामी खेड शिवापूर फाटा, भुईंज, केसुर्डी आणि शिंदेवाडी येथे मालवाहतूक व अवजड वाहने सायंकाळी चार वाजेपर्यंत थांबविण्यात आली.

पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर वाहतूक विस्कळित झाल्यामुळे खबरदारी म्हणून पुणे- बंगळूर महामार्गावरील मालवाहतूक आणि अवजड वाहतुकीला मर्यादा घालण्यात आल्या. खेड शिवापूर फाटा, भुईंज, केसुर्डी आणि शिंदेवाडी येथून जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी दररोज सकाळी सात ते अकरा वाजेपर्यंत बंदी आहे. मात्र, अपघातामुळे परिस्थिती गंभीर झाल्याने या भागातील अवजड वाहतूक आज सायंकाळी चार वाजेपर्यंत पूर्णतः थांबविण्यात आली होती, अशी माहिती शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली.

दरम्यान, अवजड वाहतूक थांबविल्यामुळे वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वाहतूक पोलिसांनी पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले होते. अपघातस्थळावरील वाहतूक काही प्रमाणात सुरू झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने अवजड आणि प्रवासी वाहनांना पुढे जाण्याची परवानगी देण्यात आली, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## अग्रलेख

# आव्हाने

जगात काहीही उत्पात घडो, खेळ चालूच राहिला पाहिजे, द शो मस्ट गो ऑन...हे जुन्या काळातील सर्कशींचे ब्रीदवाक्य होते. पोटापाण्यासाठी जोखीम पत्करून उंच पाळण्यांवर जीवघेण्या कसरती करताना सर्कसपटूंना थांबणे शक्य नसे. याचे कारण कसरती केल्या नाहीत, तर पोटाची खळगी कशी भरायची, हा 'उद्या'चा प्रश्न आ वासून समोर उभा असे. आपल्याकडच्या राजकारणातही हे धर्मवाक्य बनून गेले आहे, असे दिसते. गेल्या आठवडाभरात महाराष्ट्राच्या राजकारणात जे काही घडले, ते अभूतपूर्व आहे. शेक्सपीअरच्या शोकांतिकाही फिक्या पडतील, असे गडद प्रसंग या काळात घडले. सत्ता, प्रतिष्ठा, वारसा, राजकारण अशा अनेक अंगांनी चर्चेचा गलबला सुरु झाला.सत्ता हेच सर्वोच्च साधन ठरले की नातीगोती, दु:खवेदना आदी भावभावना वाहून जातात, याचेच प्रत्यंतर येत आहे. गेल्या २८ जानेवारीला तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाले, त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाचा पट बदलून गेल्याचा आभास निर्माण होत आहे. काही धुरीण नेते तसा आभास निर्माण करण्यात गुंतले आहेत, तर त्यांच्याहीपेक्षा अधिक धुरंधर नेते तसे काही घडणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी धडपडत आहेत. या उलथापालथीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेमके काय होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे डोळे लागले नसते, तरच नवल. अजित पवार यांच्या कथित बंडानंतर २०२३ च्या नोव्हेंबरात राष्ट्रवादी काँग्रेसची दोन शकले झाली. अजित पवारांसह एक मोठा गट सत्तेत सामील झाला, उरलेल्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याच पाठीशी उभे राहण्याचे ठरवले. गेले दोनेक महिने पुन्हा दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलिनीकरणाची चर्चा मूळ धरू लागली होती. अर्थात जे काही घडत होते, ते पूर्णपणे पडद्याआड घडत होते. तरीही दोन्ही गटांमध्ये जवळीक वाढत असल्याचे लपून राहिले नाही. महापालिका निवडणुकांमध्ये तर पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही पक्षांनी एकत्र निवडणूक लढवून पाहिली. भाजपच्या सामर्थ्यशाली विरोधात त्यांच्या पदरी यश पडले नसले तरी जवळीकीचे प्रयत्न कायम राहिले. जिल्हा परिषदांच्या निवडणुकांनंतर विलिनीकरणाची घोषणा होणार, अशा वावड्या हवेत असतानाच अजित पवार यांचा दुर्दैवी अंत झाल्याने अनेक प्रश्न अनुत्तरित राहणार आहेत. सध्या तरी अशा प्रकारचे काही विलिनीकरण होईल, अशी शक्यता मावळली आहे. अजित पवार यांच्या पश्चात त्यांचे उपमुख्यमंत्रिपद तातडीने त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याकडे सुपूर्द करण्याची `चपळाई' हाच नवा वादाचा विषय बनला. भारतीय जनता पक्षाच्या धुरीणांनी भविष्यातील विलिनीकरणाच्या संभाव्य भुयारीमार्गाची बंदिस्ती या कृतीतून केली, अशी मल्लिनाथी केली गेली, तर विलिनीकरणाच्या हालचालींच्या घाईगर्दीकडे सत्ताधारी बोट दाखवू लागले. एकूणच मानवी संवेदनशीलता राजकारणातून लुप्त झाली की काय, असा प्रश्न या सगळ्या घडामोडींतून उपस्थित झाला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर काही नेते अचानक पोपटासारखे बोलू लागले आहेत. पतीनिधनानंतर तीन-चार दिवसांतच उपमुख्यमंत्रिपदाची शपथ 'घाईघाईने' घेणाऱ्या सुनेत्रा पवारांवर टीकेची झोड उठवताना काहींनी मर्यादा ओलांडली. अजित पवार यांच्यानंतर पक्षाची धुरा कोण सांभाळणार, याचीही काळजी बऱ्याच जणांना लागून राहिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षपद कोणाकडे जावे, हा त्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे, त्याची उठाठेव अन्य पक्षातील नेत्यांना उघडपणे करण्याचे कारण नव्हते. तरीही त्यावरुन राजकारणाला ऊत आला आहे. किंबहुना या दुर्दैवी अपघाताच्या जवळपास प्रत्येक पैलूबद्दल राजकारण पेटले आहे. महाराष्ट्रातील एकूणच राजकारणाचा ढळलेला तोल सुजाण माणसाला व्यथित करणारा आहे. अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाला की तो घातपात होता? अशा शंकाकुशंकाही पद्धतशीररित्या पसरवल्या जात आहेत. वास्तविक या अपघाताचे राजकारण कुणीही करु नये, असे खुद्द ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीच स्पष्ट केले होते, शिवाय या दुर्घटनेची चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय विमान वाहतूक खात्याकडे आधीच केली आहे. चौकशी होणार असल्याने याबद्दल उलटसुलट विधाने करणे अप्रस्तुत आहे. सुनेत्रा पवार यांनी एकदा शपथ घेतल्यानंतर या चर्चांना पूर्णविराम मिळणे उचित ठरले असते. कारण अजित पवार यांचा वारसा पुढे कोण चालवणार, याचे उत्तर बरेचसे मिळून गेले आहे. अजित पवार यांचा प्रभाव असलेले वीस-बावीस साखर कारखाने, आणि अन्य सहकारी संस्था, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची वाटचाल, घड्याळ चिन्हाचा झगडा आणि मुख्य म्हणजे अजितदादांनी जोडलेला अफाट लोकसंग्रह या सर्व 'वारशा'ची जपणूक करण्याचे मोठे काम सुनेत्रा पवार यांना बघावे लागणार आहे. हे आव्हान लहानसान नव्हे. या उलाढालीत राष्ट्रवादी काँग्रेस अस्तित्व टिकवून धरेल का, हा प्रश्न आहे. त्याचे उत्तर येणारा काळ देईल. तोवर सत्ताकारणाचा खेळ सुरूच राहणार आहे.

# संत रविदास महाराजांचे विचार घराघरापर्यंत पोहोचले पाहिजेत – शेखर चवरे

## समता आणि एकतेचा संदेश देत संत रविदास महाराजांची ६४९ वी जयंती उत्साहात साजरी

**विदर्भ केसरी। यवतमाळ**




दारव्हा येथील शिवाजी हायस्कूलमध्ये संत रविदास महाराजांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. शिवसेना जिल्हाप्रमुख यशवंतभाऊ पवार आणि नगराध्यक्ष सुनीलभाऊ चिरडे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

यावेळी शहरप्रमुख राजूभाऊ दुधे, नगर परिषदेचे गटनेते कृष्णा शेलोकर, प्रकाश दुधे, सचिन जाधव, एकनाथ माहुरकर, संतोष एडमे, दीपाताई सिंगी, पल्लवीताई वाकोडे, विशाखाताई बिहाडे, कविताताई शिले, सिमाताई चव्हाण, धनंजय बलखंडे, रोनित गुल्हाने यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य प्रशांत मेश्राम यांनी संत रविदास महाराजांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचे महत्त्व विशद केले. यावेळी एसबीआय दारव्हा शाखा व्यवस्थापक शेखर चवरे यांनी संत रविदास महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच एमएसईबीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता योगेश तायडे यांनी समाजासाठी शासकीय योजना, शिक्षण, संघटन आणि मानवतेचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भाऊराव सूरस्कार होते, तर मधुकर तांडेकर आणि बाबारावजी सोरे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन गोपाल हिरवे सर यांनी केले, तर शिरीष मराठे सर यांनी आभार प्रदर्शन केले. नगराध्यक्ष सुनील चिरडे यांनी संत रविदास महाराजांनी दिलेल्या समतेच्या आणि एकतेच्या शिकवणीचे कौतुक करत समाजात एकजूट टिकवण्याचे आवाहन केले. तसेच आमदार संजयभाऊ राठोड यांच्या समाजकारणाविषयीच्या भावना उपस्थितांसमोर मांडल्या. पुढील जयंती अधिक व्यापक समाजभावनेत साजरी करण्याचा शब्द त्यांनी दिला.

यावेळी अ‍ॅड. संदीप पाटील यांच्या पुढाकाराने वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातून आलेल्या लक्ष्मण सोरे, संतोष सूरस्कार (सरपंच), गजानन दायदार, निरंजन नाचणे, उमाकांत लहाडके, राजू दायदार आणि सुनील तांडेकर यांनी नगराध्यक्ष, नगरसेवक व मान्यवरांचा नागरी सत्कार केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्याम इंगळे, राजेंद्र धामणे, अशोक पाचखंडे, वामन सूरस्कार, विशाल तांडेकर, नानू तांडेकर, सहादेव खंडारे, जगजीवन खंडारे, दिगंबर पाटील, शुभम तांडेकर, सूर्यप्रकाश दायदार, गजानन इंगळे, निलेश पाटील, गौरव इंगळे, शाम खडतरे, मारोतराव पाचखंडे, गुड्डू खडतरे, विवेक मनगटे, उमेश मनगटे, प्रकाश पुरस्कार, गोपाल पाटील तसेच दारव्हा चर्मकार समाजातील महिला मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# यवतमाळात भव्य जैन बिझनेस कार्निवल

## उद्योजकतेला नवी दिशा देणारा चार दिवसीय महोत्सव

YAVATMAL JOSH FOUNDATION

**विदर्भ केसरी। यवतमाळ | प्रतिनिधी, दि. ४ फेब्रुवारी**

उद्योजकता, नवकल्पना आणि व्यापाराच्या नव्या संधींचा संगम साधणारा भव्य जैन बिझनेस कार्निवल यवतमाळ शहरात 6 ते 9 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

समता मैदान, यवतमाळ येथे होणाऱ्या या चार दिवसीय कार्निवलचे आयोजन जोश फाऊंडेशन यांच्या वतीने करण्यात आले असून, स्थानिक ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योजक, व्यापारी, स्टार्टअप्स आणि नवोदित व्यावसायिकांसाठी हे एक प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. या बिझनेस कार्निवलमध्ये विविध उद्योग क्षेत्रांतील आकर्षक स्टॉल्स, उत्पादन व सेवांचे सादरीकरण, नेटवर्किंग सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तसेच व्यवसायवाढीसाठी उपयुक्त माहिती व संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन, स्थानिक व्यवसायांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि उद्योजकांमध्ये परस्पर सहकार्य वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. व्यवसायासोबतच मनोरंजनालाही विशेष स्थान देण्यात आले असून, लाईव्ह ऑर्केस्ट्रा, लहान मुलांसाठी खेळणी, विविध प्रकारचे रुचकर खाद्यपदार्थ आणि नव्या संकल्पनां

# कुपोषित बालकांना मदतीचा हात!

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



मनसेचे नेतृत्व तसेच नवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल हमदापुरे यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील कुपोषित बालकांना प्रोटीन पावडर, पोषक आहार आणि जीवनावश्यक वस्तूंचे आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन स्थानिक टिळक स्मारक येथे २८ जाने. रोजी टिळक स्मारक येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन अनिल हमदापुरे मित्र परिवार आणि नवक्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिराला प्रामुख्याने साईश्रद्धा हॉस्पिटलचे डॉ. विजय मुन, मनसेचे जिल्हाध्यक्ष देवाभाऊ शिवरामवार, नवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल हमदापुरे, डॉक्टर अनिल आखरे, डॉ. तारक सर,डॉ. स्वप्नील पतींगे,यवतमाळ जिल्हा कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर सर, एमएसआरए संघटनेचे अनुप भुसावार तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या सर्व कुपोषित बालकांना पोषण आहाराच्या किटचे वाटप करण्यात आले. ५०० बालकांची मोफत हृदय शस्त्रक्रिया, कॉकलीयर एम्प्लान्ट, बोन म्यारो,पायाची शस्त्रक्रिया,नेत्र शस्त्रक्रिया, कोरोना काळातील सामाजिक कार्य सह अनेक समाज उपयोगी उपक्रम अविरत पणे सुरू असल्याची माहिती या प्रसंगी देण्यात आली, . या कार्यक्रमासाठी विशेष करून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे फार्मासिस्ट सोना तलरेजा, ममता कापसे ,चंद्रशेखर खडतरे, तसेच मातोश्री नर्सिंग महाविद्यालयाचे विशेष सहकार्य लाभले, यासह आरबीएसके चे कार्यक्रम अधिकारी कुणाल पिसोळे आणि जिल्हा आरोग्य विभागाचे औषधी निर्माते जाधव सर आणि मातोश्री नर्सिंग च्या परिचारिका ,अंगणवाडी सेविका सीमा क्षीरसागर , वर्षा राठोड , अर्चना हुमणे, कुमुदिनी नागपुरे, माधुरी भारती, प्रीती डफडे, वर्षा वानखेडे, संगीता ताकसांडे, संगीता भेंडे, प्रतिभा कायकुटे, रेशमा गौरकर,यांनी विशेष सहकार्य दिले. या शिबिरासाठी एमएसएमआरए संघटनेचे अमोल चौधरी,अनुप भुसावार, प्रणय बनुकर,ब्रिजेश त्रिपाठी यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबिराला प्रामुख्याने शिवसेनेचे विकास पवार, अनिल सोळंकी, जिल्हा परिषद पतपेढीचे अध्यक्ष महेश सोनेकर सर, यांनी सदिच्छा भेट दिली. या कार्यक्रमासाठी यशस्वीतेसाठी सौरभ अनसिंगकर, शिवम नांदुरकर, अंजली पारधे, तिलक गुगलीया,वसीम मवाल सौरभ अनसिंगकर, नरेश गंगावणे, हेमंत जोशी, सुधांशू काळे, संदीप गाडगे, सालिक भाई,पद्मनाभ जोशी,यांनी अथक परिश्रम घेतले. या शिबिरासाठी मोठ्या प्रमाणात बालकांचे पालक, नवक्रांती संघटनेचे रेहान लाला, अनिल मेश्राम,बंटी राजूरकर,निरज पातलबन्सी, सोनु मस्के, सागर नांदेकर,अशोक खोडे,मुकेश खरवडे, अमोल बोबडे, नितीन चौधरी, सचिन चौधरी,गोपाल वाघधरे, इतर कार्यकर्ते उपस्थित होते

# अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक सुविधा त्वरित सोडवा

## वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवकांच्या वतीने नगराध्यक्ष यांना निवेदन

**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



वंचित बहुजन आघाडीच्या ६ नगरसेवकांच्या वतीने नगराध्यक्ष हर्षल साबळे यांना दि. ३ फेब्रुवारी रोजी निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात पुढे म्हटले आहे की,जुनी वस्ती भागातील मुस्लिम स्मशानभूमी लगत असलेल्या रोडच्या बाजूने खड्यात घाण कचरा टाकण्यात येत असून सदर घाणीमुळे रस्त्यावर सर्वत्र दुर्गंधी पसरत आहे.या रोड ये-जा करणे सुद्धा कढीन झाले आहे, चिंधी तलाव चौक येथील अब्दुल अकील म्हैसावाले यांच्या घराजवळ मुस्लिम समाज सभागृह करिता राखीव जागेत विकास फंडातून सार्वजनिक सभागृह बांधण्यात यावे,स्टेशन विभाग परिसरातील जे.बी. हिंदी शाळांमध्ये सध्या उर्दू माध्यमाचे हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय आहे, सदर शाळा महाविद्यालय जुनी वस्ती येथे स्थलांतरित करावी, जुनी वस्ती भागातील गुलाम नबी आझाद शाळेजवळील तलावाचे बांधकाम करण्यात आले असून त्या ठिकाणी सार्वजनिक बगीचा उभारण्यात आला आहे. त्या बगीचाला भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचे नाव देण्यात यावे. मोहम्मदया प्लॉट चौक पासून ते आसरा रोड लगत जुन्या घरकुल पर्यंत स्ट्रीट लाईट लावावे. या सर्व मागण्या त्वरित पूर्ण करण्यात याव्यात पूर्ण न झाल्यास लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरून जन आंदोलन करू असे यावेळी निवेदनात नमूद केले आहे. यावेळी नगरसेवक गटनेता तसव्वर खान तसलीम खान, नगरसेविका सुनंदा नंदू सोळंके, नगरसेविका कुरेशी शमीमबानो अ. रफिक,नगरसेवक अ. बाकी अ. अजीज,नगरसेवक निजामुद्दीन इस्लामुद्दीन (ललकार),नगरसेविका फैमीदाबी कलीमोद्दीन पटेल,वंचित बहुजन आघाडी शहर उपाध्यक्ष प्रशांत सोळंके,सचिव प्रशांत गडवाले,महासचिव करण वानखडे, कोषाध्यक्ष सागर चावरे,माजी नगरसेवक रफिक कुरेशी,अ.शौताज,समाजसेवक सद्दाम पटेल आदी उपस्थित होते.

# मुर्तिजापूर तालुक्यातील मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष अरविंद कोकाटे यांना 'लोकमत कार्य गौरव' पुरस्काराने सन्मानित.

## अभिनेत्री वीणा जगताप यांच्या हस्ते गौरव.

## सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल.

**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



अखिल भारतीय मराठा महासंघाचे तालुकाध्यक्ष, मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष तथा पूर्णा शालेय पतसंस्थेचे संचालक अरविंद कोकाटे यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील उत्तुंग कार्याची दखल घेत, त्यांना 'लोकमत' समूहाच्या वतीने मानाच्या 'कार्य गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रसिद्ध मराठी सिने अभिनेत्री वीणा जगताप यांच्या हस्ते हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी अविरत धडपड अरविंद कोकाटे हे केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित न राहता, समाजाच्या विविध घटकांसाठी सदैव तत्पर असतात. नैसर्गिक आपत्तीच्या काळात हवालदिल झालेल्या शेतकरी बांधवांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी ते नेहमीच प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करतात. त्यांच्या या संवेदनशील कार्यामुळे शेतकरी वर्गात त्यांचे मोठे नाव आहे. गुणवंतांचा सन्मान आणि मुख्याध्यापकांचे संघटन शैक्षणिक क्षेत्रात काम करताना त्यांनी गुणवत्तेला नेहमीच प्राधान्य दिले आहे. १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी ते नियमितपणे 'गुण गौरव सोहळा' आयोजित करतात. याशिवाय, मुख्याध्यापकांच्या कार्याला सन्मान मिळावा यासाठी सेवानिवृत्त मुख्याध्यापकांचा निरोप समारंभ आणि नवीन रुजू झालेल्या मुख्याध्यापकांचा स्वागत सोहळा अशा अभिनव उपक्रमांतून त्यांनी एकीची भावना जोपासली आहे. सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आणि प्रदान करण्यात आल्याबद्दल संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. कोकाटे यांच्या या यशाबद्दल: अखिल भारतीय मराठा महासंघ मुख्याध्यापक संघ, मुर्तिजापूर शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ यांच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले आहे. कोकाटे यांनी हा पुरस्कार आपल्या सहकाऱ्यांना आणि समाजकार्याला समर्पित केला असल्याचे यावेळी सांगितले.

# देव कळायला श्रद्धा तर माणूस कळायला माणुसकी लागते : भागवतचार्य योगी निरंजननाथ




**विदर्भ केसरी। प्रतिनिधी / अमोल धवसे**

नांदगाव खंडे तालुक्यातील श्री क्षेत्र सावणेर येथे संत वामन महाराज जन्मोतस्वा निमित्त वर्ष 62वे श्रीमद भागवत व व्यसन मुक्ती सप्ताह बुधवार दि 4/2/2026ते बुधवार दि 11/2/2026पर्यंत सुरु असून संत बालवामन महाराज यांच्या मार्गदर्शनात व पूज्य उत्तम स्वामीजी महाराज हरिद्वार यांच्या उपस्थिती त होणार असून नामवन्त कीर्तनकराचे कीर्तन राहील तसेच मुंबई येथील डा सुभाष भोयर व डा स्मिता भोयर यांची मोफत वेधकीय तपासणी व औषध उपचार सेवा उपलब्ध राहणार आहे भक्तीमय वातावरनात भागवत कथा चालू असून भागवतचार्य योगी निरंजन नाथ गुरु शांतीनाथ भागवत करताना मनाले कि भावना कळायला मन लागत. वेदना कळायला जाणीव लागते. देव कळायला श्रद्धा लागते व माणूस कळायला माणुसकी लागते मनून सर्वांशी प्रेमाने वागा व घर परिवार सुखी राहण्यासाठी व्यसनाचा त्याग करण्याचा संदेश त्यांनी दिला यावेळी भाविकांनी गर्दी केली होती

# आत्मनिर्भर भारताचे उदिष्ट साध्य करणारा अर्थसंकल्प

**विदर्भ केसरी। यवतमाळ,**




आत्मनिर्भर भारताचे उदिष्ट साध्य करण्यासाठी आणि विकसित भारताचा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प आहे. तसेच या माध्यमातून निधारपूर्व पाऊल टाकण्यात आल्याची माहिती अर्थ विशेषज्ञ सीए मिलिंद कानडे यांनी बुधवार, 4 फेब्रुवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, भाजपाचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. प्रफुल चौहान, जिल्हा सरचिटणीस राजू पडगिलवार, नगरसेवक रेखा कोठेकर, नगरसेवक प्राचार्य डॉ. अमोल देशमुख, योगेश पाटील, आकाश धुरट, शंतनू शेटे हे भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना कानडे म्हणाले, नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात विविध वैशिष्ट्ये आहेत. त्यात पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी 12 लाख कोटींची मोठी तरतूद करण्यात आली आहे. यातून देशात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद ते बंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई, चेन्नई ते बंगळुरू, दिल्ली ते वाराणसी, असे सात हायस्पीड कॉरिडॉर विकसित होणार आहेत.

आगामी 5 वर्षांत 20 नवीन राष्ट्रीय जलमार्ग तयार करण्यात येणार आहेत. याची सुरुवात ओरिसातील जलमार्ग क्रमांक 5 पासून करण्यात येणार आहे. रस्ते व रेल्वे मार्गाऐवजी जल व समुद्री मार्गाचा वापर वाढावा, यासाठी कोस्टल कार्गो प्रोत्साहन योजन सुरू करण्यात येणार आहे. जलमार्ग आणि किनारी जलवाहतुकीचा वाटा सध्याच्या 6 टक्क्यांवरून 12 टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला सुद्धा खूपकाही मिळाले आहे. यात डिव्हॅल्युशन ऑफ टॅक्सेसमधून यावर्षी महाराष्ट्राला सुमारे 98 हजार 306 कोटी रुपये केंद्र सरकारकडून मिळणार आहेत. म्हणजेच जवळपास 1 लाख कोटी रुपये हा निधी मागील वर्षापेक्षा जास्त असून, पुढील वर्षी तो आणखी वाढणार आहे.

### 'ग्रामीण रस्ते'साठी ३७८ कोटी

- **ग्रामीण रस्ते प्रकल्पासाठी 378 कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. ग्रीन बिझनेस नेटवर्कसाठी 167 कोटी तर इकॉनॉमिक क्लस्टरसाठी 283 कोटी रुपये देण्यात आले आहेत. तर मानव विकासासाठी कौशल्य आणि ज्ञानविकास कार्यक्रमासाठी 313 कोटी रुपये देण्यात आले ल्याची माहिती यावेळी देण्यात आली.**
- **तसेच उपसा जलसिंचन योजनांच्या सौर ऊर्जाकरणासाठी 207 कोटी, तर अ‍ॅग्री बिझिनेस अँड रुरल ट्रान्सफॉर्मेशनसाठी 646 कोटी रुपये देण्यात येणार असल्याची माहिती अर्थ विशेषज्ञ सीए मिलिंद कानडे यांनी या पत्रपरिषदेत दिली.**

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक
विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६


GOOD MORNING
# कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## परीक्षेसाठी निर्माण झालेली अडचण दूर


सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीपर्यंत अध्यापन करणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना दोन वर्षात शिक्षक पात्रता परीक्षा (टीइटी) उत्तीर्ण होणे बंधनकारक केल्यानंतर राज्यात शिक्षकांसमोर आधीच अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायलाने निवडणुकांसदर्भातील असेच बंधन घालून दिल्याने दुसरी अडचण निर्माण झाली आहे. केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) ७ जुलै २०२६ रोजी होणार आहे. तर राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे.

## महत्त्वाचे

### पुसद वकील संघाच्या खनिजदारपदी (कोषाध्यक्ष )अ‍ॅड. अमोल भालेराव

**▸विदर्भ केसरी। पुसद**

वकील संघाच्या सन 2026 च्या निवडणुकीत अ‍ॅड. अमोल भाऊ भालेराव



यांची खनिजदार (कोषाध्यक्ष) पदावर बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली आहे. सदर पदासाठी एकमेव उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांची बिनविरोध निवड घोषित केली.

अ‍ॅड. अमोल भालेराव हे पुसद येथील न्यायालयात गेल्या अनेक वर्षांपासून वकिली व्यवसायात कार्यरत असून संघटनेच्या कार्यात त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग राहिला आहे. संघटनेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये शिस्त, पारदर्शकता व जबाबदारी राखण्याची त्यांची भूमिका लक्षात घेता, त्यांच्या निवडीचे वकील संघाच्या सदस्यांकडून स्वागत करण्यात आले आहे. या निवडीबद्दल पुसद वकील संघाचे पदाधिकारी, ज्येष्ठ वकील तसेच सदस्यांनी अ‍ॅड. अमोल भालेराव यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या कार्यकाळात संघटनेच्या आर्थिक व्यवस्थापनास अधिक सक्षम दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### ७ वाहनांमधील बॅटऱ्या चोरल्या

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

गिट्टी खदानीवर उभ्या असलेल्या ७ वाहनांतील बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने लंपास केल्या. ही घटना दारव्हा तालुक्यातील बागवाडी येथे साई स्टोन क्रेशन गिट्टी खदानीत ३१ जानेवारीला घडला. या प्रकरणी महादेवराव बापूराव काळे (६५) रा. सायखेडा यांनी दारव्हा पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार एका ४०७ वाहनातील तसेच ६ ट्रॅक्टरमधील एकंदर ७ बॅटऱ्या चोरीस गेल्या आहेत. पोलिसांनी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल केला आहे.

### जागेच्या मालकीवरून महिलेला मारहाण

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

तुमच्या घराची जागा आमची आहे, असे म्हणत एका इसमाने महिलेशी वाद घातला. यात त्या महिलेला गंभीर मारहाण करण्यात आली. ही घटना दिग्रस तालुक्यातील सावंगा खुर्द येथे ३ फेब्रुवारीला घडली. जयश्री निळकंठ भुसाळे (३२) रा. सावंगा खुर्द यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांना गजानन एकनाथ खांदवे (४२) रा. सावंगा खुर्द याने मारहाण केली. जागेच्या मालकीवरून वाद घालत खांदवे याने भुसाळे यांना शिवीगाळ करत काठीने मारहाण केली. उजव्या हाताच्या बोटावर मारून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. प्राप्त फिर्यादीवरून दिग्रस पोलिसांनी गजानन खांदवे विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### तीन लाखांचा गुटखा पकडला

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या विक्री होत आहे. त्यावर शिक्कामोर्तब करणारी कारवाई पुसद शहरात पुढे आली. पुसदच्या एका गोडावूनमधून पोलिसांनी तब्बल २ लाख ९६ हजार २२५ रूपयांचा गुटखा जप्त केला. ३१ जानेवारीला केलेल्या या कारवाईत ३ फेब्रुवारीला पुसद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुसद शहरातील मदिना मस्जीदजवळील हमीद याकूब इसानी यांच्या गोडावूनमध्ये पोलिसांनी छापा टाकला. तेथे मानवी शरीरास अपायकारक असलेला वेगवेगळ्या प्रकारचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि पान मसाला (गुटखा) मुद्देमाल आढळून आला. या प्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक केदार यांच्या फिर्यादीवरून हमीद याकूफ इसानी रा. मदिना मस्जीदजवळ महात्मा फुले वार्ड पुसद याच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### शेतकरी साहित्य संमेलन आता थंड हवेच्या गावी, हवशा गवश्यांनी येवू नये

**▸विदर्भ केसरी। वर्धा :**

शेतकरी हा एक स्वतंत्र विषय. त्याचे प्रतिबिंब प्रचलित साहित्य संमेलनात कधीच उमटले नाही, अशी खंत शेतकरी नेते व्यक्त करतात. समाजातील हा एक मोठा आधार असलेल्या शेतकऱ्यांचे वास्तव पुढे आले पाहिजे म्हणून शेतकरी साहित्य संमेलन ही संकल्पना पुढे आली आणि ती यशस्वी पण ठरली. विविध ठिकाणी १३ अशी संमेलने भरली. आता १४ वे अ.भा.मराठी शेतकरी साहित्य संमेलन महाबळेश्वर येथे आयोजित होणार आहे. लातूर येथील ज्येष्ठ शेतीसाहित्य अभ्यासक तथा समीक्षक मा. प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत यांची संमेलनाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. कल्पनाविश्वात रमणाऱ्या आभासी शेतीसाहित्याची शेतीमधल्या प्रत्यक्ष उद्यमीतेच्या वास्तवाशी नाळ जोडण्यासाठी, सांप्रत शेती व्यवसायाला जखडणाऱ्या मानवनिर्मित बेड्यांची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या दाहक समस्यांची मराठी साहित्यविश्वाला जाणीव करून देण्यासाठी, नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या शेतीअर्थशास्त्र, अनर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाविषयीच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी, मराठी साहित्य-सारस्वतांची कृषि उद्योगीजगतासोबत सांगड घालून त्यांना

# भाविकांची पायपीट

## कचारगड यात्रा: एसटीच्या ढिसाळ नियोजनाच्या कारभाराचा भक्तांना फटका

**▸विदर्भ केसरी। गोंदिया:**

**गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यात आदिवासी तीर्थक्षेत्र कचारगड यात्रेत देशभरातून लाखो आदिवासी सहभागी होतात.. तथापि एसटीच्या गोंदिया आगाराने यात्रेसाठी कमी गाड्या सोडल्याने यात्रेकरूंची गैरसोय झाली.**



एसटीतर्फे १५ विशेष बसेस सोडणार अशी घोषणा करण्यात आली होती. पण अगदी तिसऱ्या दिवसा पासून बसेसची संख्या कमी झाली. संध्याकाळी ५ नंतर कचारगडला जाण्यासाठी किंवा ७ नंतर सुटण्यासाठी एसटी बसेस उपलब्ध नसल्याने, हजारो यात्रेकरूना जवळच्या दरेकसा रेल्वे स्थानकावर पोहोचण्यासाठी ५ किलोमीटर ची पायपीट करावी लागली. परिणामी, मोजक्याच रेल्वे गाड्यांचा थांबा असल्यामुळे नेहमीच निर्जन दिसणाऱ्या या छोट्या दरेकसा स्थानकावर हजारो च्या संख्येने प्रवासी त्यांच्या गंतव्यस्थानावर जाण्यासाठी गाड्यांची वाट पाहत उभे राहिले. पण या स्थानकावर मोजक्याच पसेंजर गाड्यांचा थांबा असल्यामुळे तिथेही त्यांना तासनतास वाट पहावी लागली. या काळात अनेक प्रवासी पुलाचा वापर करण्याऐवजी पायी रुळ ओलांडून आपला जीव धोक्यात घालताना दिसले.

या संदर्भात एसटी गोंदिया डेपो मॅनेजर यतीश कटरे म्हणाले की, यात्रेदरम्यान कचारगडसाठी १५ अतिरिक्त बसेस चालवण्याचे नियोजन होते. परंतु कर्मचाऱ्यांची कमतरता आणि इतर काही कारणांमुळे काही फेऱ्यांवर परिणाम झाला, परंतु बहुतेक बसेस नियोजनानुसार धावल्या. कचारगडला जाण्यासाठी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आणि तेथून परत येण्यासाठी सायंकाळी ७ वाजेपर्यंत बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. ज्या नियोजित वेळापत्रकानुसारच राहिल्या. त्यानंतर प्रवाशांना खाजगी मार्गाने किंवा रेल्वेने प्रवास करण्याचा पर्याय उपलब्ध होता

पाच दिवसीय कचारगड यात्रेत देशाच्या कानाकोपऱ्यातील गोंड, आदिवासी समाज बांधवांनी हजेरी लावून त्यांच्या दैवतांचे स्मरण केले. गोंडी धार्मिक परंपरा, बोलीभाषा, पूजाविधी, नृत्य, चालीरीती, कला, संस्कृती दर्शन यात्रेदरम्यान घडले. देशातील १८ राज्यातून पाच लाखांवर गोंडी भाविक कचारगड येथे आले होते. त्यात महाराष्ट्र, छत्तीसगड, मध्य प्रदेश, तेलंगणा, बिहार, झारखंड, ओडिशा, बंगाल, उत्तर प्रदेश व आंध्र प्रदेशातील आदिवासी भाविकांची संख्या जास्त होती, तर दिल्ली, उत्तराखंड, आसाम अरुणाचल प्रदेश मेघालय, कर्नाटक ,नागालँड ,गुजरात या राज्यातील आदिवासी बांधवांसह इतर ही नागरिकांच्या सुद्धा समावेश होता.

### अवकाळी टळलं, पण वारं फिरलं

**▸विदर्भ केसरी। नागपूर :**

राज्यात मार्चच्या मध्यान्हपर्यंत थंडी राहणार असा जो अंदाज वर्तविण्यात आला होता, तो आता खरा ठरू लागल्याचे चित्र आहे. थंडीने जवळजवळ काढता पाय घेतला असून उन्हाळ्याची चाहूल लागणारे उन्ह जाणवायला सुरुवात झाली आहे. फेब्रुवारीच्या सुरूवातीपासूनच महाराष्ट्रत गारठा कमी होत असल्याचे जाणवू लागले असून कोकण किनारपट्टीवरील वातावरण दमट होण्यास सुरूवात झाली आहे. मुंबईमध्ये आज दिवसभार वातावरण उष्ण राहील असा अंदाज हवामान विभागाने काल वर्तवला होता. काही ठिकाणी तर पारा ३४ अंश सेल्सियसपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. विदर्भात दिवसा उन्ह आणि रात्री हलकी थंडी आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील काही भागांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर ठिकठिकाणी ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रासह कोकणातील काही भागांत ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. येत्या काही दिवसात हवामान स्थिर राहून फारसा बदल होणार नसल्याची शक्यता आहे. सध्या महाराष्ट्रातील हवामानात हळूहळू स्थिरता येताना दिसत आहे. मागील काही दिवसांच्या बदलत्या वातावरणानंतर आता राज्यात ढगाळ वातावरण निवळत असून कोरडे हवामान अनुभवास येत आहे.

## ग्रामपंचायत कारेगाव (रामपूर) भोंगळ कारभार ?

### 26 जानेवारीची ग्रामसभा झालीच नाही

### समिति निवड नियंबाहह वारंवार तक्रार पण गटविकास अधिकारी चे दुर्लक्ष

**▸विदर्भ केसरी। पांढरंकवडा(ता. प्रतिनिधी):-विरेंद्र चव्हाण**

पांढरंकवडा :-ग्रामपंचायत कारेगाव (रामपूर) भोंगळ कारभार बाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती पांढरकवडा यांना सामाजिक कार्यकर्ते विजय खापर्डे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे ग्रामपंचायत कारेगाव, (रामपूर )येथे 26 जानेवारी ते आज पर्यंत ग्रामसभा न घेतल्या बाबत अर्ज सदर व्यक्ती यांनी कारेगाव (रामपूर)ग्रामपंचायत मध्ये आज पर्यंत कोणतीही ग्रामसभा घेतलेली नाही जे काही ठराव घेतले आहे ते संपूर्ण ठराव गावातील जनतेला न विश्वासात घेता नियंबाह्ह घेतलेलेआहे जे काही ग्रामसभा आज पर्यंत दाखवली ते संपूर्ण कागदोपत्री दाखवली आहे प्रोसिडिंग रजिस्टर वर जेवढ्या सह्या आहेत त्या खोट्या आहे यांनी स्वतः सह्या केलेल्या आहे यांनी आजपर्यंत जेवढे काम केले त्याबाबत आजपर्यंत जनतेला कोणताही हिशोब दिला नाही सन 2022 ते 2026पर्यंत चे कारेगाव (रामपूर)ग्रामपंचायतमध्ये जल जिवन चे काम निकृष्ट दरज्याचे पेसा योजनेचे पैसे मध्ये अफरातफारी केला गेला,तांडा वस्थी रोड, कारेगाव सार्वजनिक शौचायला मध्ये घोळ,वषे लोटून हि जनतेच्या उपयोगी नाही रामपू(कारेगाव) येथील अंडरग्रावून पाईप लाईन चे चेंबर फुटले गेले 15वित्त आयोग ची निधी त घोळ आजपर्यंत संपूर्ण कामाची माहिती ग्रामसभा घेऊन ऑन कॅमेरा जनतेला खर्चाचा हिशोब याबाबत आणि ज्या काही समित्या नेमल्या त्या सुद्धा ग्रामसभेतून नेमल्या नाही त्या समित्या बरखास्त करून नवीन समित्या घेण्यात याव्या व संपूर्ण कामाची चौकशी करण्यात यावी संपूर्ण कामाबाबत सर्व बिल खाते कामाचा फोटो सहित सर्व जनतेसमोर दाखविण्यात यावे सदर तक्रारदार यांनी ह्या आधी दिलेली तक्रार दिनांक 12जानेवारी 2024 ला सुद्धा तक्रार करून कार्यवाही झालीच नाही काय चौकशी केली ती सुद्धा माहिती देण्यात यावी ग्रामसभा घेण्यासाठी सात दिवस आधी नोटीस काढण्यात यावी पंचायत समिती मार्फत समिती नेमून ग्रामसभा घेण्यात यावी व ग्रामपंचायत ची ऑडीट करण्यात यावे संपूर्ण तक्रारीची पारदर्शक चौकशी करण्यात यावी करीता विजय खापर्डे यांनी प्रतिलिपी जिल्हाधिकारी साहेब यवतमाळ मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की जिल्हा परिषद यवतमाळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे

## मध्य प्रदेशातील महिलेचा गोंदियातील जंगलात मृतदेह

**▸विदर्भ केसरी। गोंदिया:**

दवनीवाडा पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या बोंडराणी जंगलात एका तरुणीचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळला. ही घटना मंगळवार ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. मृत महिलेच्या चेहऱ्यावर ॲसिड टाकल्याचे व शरीरावर जखमा असल्याचे आढळल्याने तिचा खून करून मृतदेह जंगलात फेकल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पुनम राकेश तुमाने (वय २८, रा. खैरी, जिल्हा बालाघाट, मध्य प्रदेश) असे मृत महिलेचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पुनम तुमाने ही महिला २८ जानेवारी रोजी खैरी येथीलच संजय तितमारे याच्यासोबत वाराशिवनी न्यायालयात पेशी असल्याचे सांगून घरून आली होती. यानंतर पुनम व संजय हे दोघेही २८ जानेवारीला तिरोडा तालुक्यातील परसवाडा टी पॉइंटवर आले. तिथून पूनमने आपल्या आईला घरी येणार आहे एवढे सांगून फोन कट केला. मात्र रात्री उशिरापर्यंत पुनम घरी परतली नाही. तिकडे संजयने पुनमच्या घरी जाऊन तुमची मुलगी माझ्यासोबत परत आली नाही, ती घरी आली का? अशी विचारणा पुनमच्या वडिलांना केली. यानंतर ते वाराशिवणी व रामपायलीकडे पूनमचा शोध घेण्यासाठी गेले. पण तिचा शोध न लागल्याने बालाघाट जिल्ह्यातील खैरलांजी पोलीस ठाण्यात ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली होती. मंगळवार, ३ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास बोंडराणी जंगलाकडे जाणाऱ्या पांदण रस्त्यालगत पळसाच्या झाडाखाली एका तरुणीचा मृतदेह चंद्रकुमार भगत या स्थानिक शेतकऱ्याला दिसून आला.

## सेवाभावी महिलांकडून नंददीप फाउंडेशनला मोठे सहकार्य

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी नंददीप फाउंडेशन बेघर मनोरुग्ण निवारा केंद्र, यवतमाळ येथे उमरेड येथील सेवाभावी नागरिकांनी भेट देत मोठ्या प्रमाणात मदत सुपूर्द केली.

या वेळी सौ. वसुधा ताई खंते, सौ. शोभाताई दीपक बालपांडे, सौ. अरुणा अरविंद हजारे, सौ. अलका एम. खेतकर, भावेश रामजी मोहतकर व नथ्थू तुळशीराम वसुरकर यांनी केंद्रास भेट दिली.अनिल गोविंदानी (अध्यक्ष, युथ फाउंडेशन, उमरेड) यांच्या माध्यमातून बोलेरो पिकअप वाहन भाड्याने घेऊन उमरेड शहरातून कपडे व किराणा धान्य संकलित करून ते नंददीप फाउंडेशनला सुपूर्द करण्यात आले.

माननीय सौ. वसुधा ताई खंते यांनी आपल्या मुलाच्या नावाने जवळपास २५ हजार रुपयांचा किराणा दिला. त्यामध्ये माननीय डॉ. विकास ऊरकूडाजी खंते यांच्या माध्यमातून—१८० किलो तांदूळ, २१० किलो गहू, ३० किलो तूरडाळ, तेलाचे दोन पिपे, २०० पाकिटे बिस्किटे अशी मोठी मदत करण्यात आली. यासोबतच शोभा दीपक बालपांडे यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही ११ हजार रुपयांची आर्थिक देणगी देऊन सेवेची परंपरा कायम ठेवली. या वेळी पाहुण्यांनी निवारा केंद्रातील कार्य प्रत्यक्ष पाहिले. पूर्वी उमरेड येथून दाखल करण्यात आलेली एक मूक-बधिर महिला आज पूर्णपणे बरी होऊन सन्मानाने जीवन जगताना पाहून सर्व भावूक झाले. अलका एम. खेतकर यांनी नंददीप फाउंडेशनच्या पारदर्शक कार्यपद्धतीचे कौतुक करत, "येथे सर्व काही मोकळेपणाने दाखवले जाते. मन स्वच्छ आहे आणि कामही स्वच्छ आहे," असे मत व्यक्त केले.

## बहुजन मुक्ती पार्टीच्या पाठपुराव्याला यश

### अपघातात मृत झालेल्या टेंभुर्दरा येथील विद्यार्थ्याच्या कुटुंबाला मिळाला न्याय!

**▸विदर्भ केसरी। मिलिंद चिकाटे.**

मागील वर्षी 25 जानेवारी 2025 रोजी टेंभुर्दरा येथील स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा विद्यार्थी विश्वनाथ दादाराव ब्रम्हटेके हा उमरखेड कडे प्रवास करत असताना झालेल्या अपघातात उपचारादरम्यान नांदेड येथे अकास्मिक अपघाती मृत्यू झाला.यांनतर कुटुंबावर प्रचंड मोठी शोककळा पसरली.12 वी मध्ये जिल्ह्यातून प्रथम येणारा,प्राथमिक ते उच्च शिक्षनापर्यंत प्राविण्य प्राप्त करणारा,आयएएस अधिकारी बनल्यावर घरची अठरावीश्वे दरिद्री संपेल अशी अनेक स्वप्न उराशी घेऊन जगणाऱ्या आई वडिलांवर,आपला एक अतिशय हुशार मुलगा गमावल्यामुळे दुःखाचा डोंगर कोसळला.यातून कुटुंबावर प्रचंड



कर्ज आणि मानसिक ताण आलेला होता.

अशातच बहुजन मुक्ती पार्टी चे उमरखेड तालुक्यातील युवा नेतृत्व विद्वान केवटे यांच्याकडे सदर मृत विद्यार्थ्यांच्या मोठ्या भावाने संपर्क घेऊन ह्या प्रकरणी शासनाकडून आर्थिक सहाय्यरुपी न्याय मिळवून देण्यासाठी सांगितले.ही माहिती मिळताच सतत च्या पाठपुरावा आणि संघर्षातून दोन दिवसांपूर्वी पीडित कुटुंबाला स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेतून 2 लाख रुपयांचा सहायता निधी प्राप्त करून दिला. यानंतर त्यांनी आज ह्या कुटुंबीयांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि "यापुढे देखील गोर गरीब सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सदैव सोबत राहू या प्रकरणी आम्ही उमरखेड कृषी विभागाचे देखील आभार व्यक्त करतो."अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.

यावेळी लहुजी क्रांती मोर्चा चे दिलीप कलाले,राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे शेख जब्बारभाई,बहुजन मुक्ती पार्टी चे अमोल पाटील,प्रकाश कांबळे,कृष्णा चंद्रवंशी, पत्रकार मिलिंद चिकाटे, यांसह मृत पावलेल्या विद्यार्थ्याचे कुटुंबीय आई अनिता दादाराव ब्रम्हटेके,शंकर ब्रह्मटेके, दादाराव ब्रम्हटेके,तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

**▪ अत्यंत हुशार असलेला आणि यूपीएससी ची तयारी करणारा माझा भाऊ अचानक अपघातात मृत पावल्यानंतर आमचे कुटुंब आर्थिक,मानसिक रित्या खचलेले होते.अशात बहुजन मुक्ती पार्टीचे विद्वान भाऊ केवटे यांनी सतत पाठपुरावा करून आम्हाला हा न्याय मिळवून दिला. याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो.- शंकर ब्रह्मटके - (मृत विद्यार्थ्याचे भाऊ टेंभुर्दरा)**

## रुग्णांच्या वेदना झाकण्यासाठी बनावट अहवाल ?

### गुरुदेवची अधिष्ठात्यांवर कारवाईची मागणी : शासकीय रुग्णालय समस्यांचे माहेरघर; गुरुदेव युवा संघाचा थेट हल्ला

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ :**

श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथील गंभीर समस्या झाकण्यासाठी अधिष्ठात्यांनी जाणीवपूर्वक चुकीचा व खोटा अहवाल सादर केल्याचा गंभीर आरोप गुरुदेव युवा संघाने केला आहे. या प्रकरणी संबंधित अधिष्ठात्यांवर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करावी, अशी ठोस मागणी संघाच्या वतीने मुख्यमंत्री सचिवालय, वैद्यकीय मंत्री व संबंधित वरिष्ठ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



गुरुदेव युवा संघाच्या म्हणण्यानुसार, रुग्णालयातील अस्वच्छता, स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था, रक्तपेढीमधून गोरगरीब रुग्णांना रक्त देण्यास टाळाटाळ, कर्मचाऱ्यांची उर्मट वागणूक, दिव्यांगांसाठी व्हीलचेअर व यूआयडी केंद्राचा अभाव, २४ तास औषधांची अनुपलब्धता, पिण्याच्या पाण्याची गैरसोय तसेच किरकोळ भांडारात लाखो रुपयांचा कथित भ्रष्टाचार या समस्या वारंवार निदर्शनास आणूनही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. या गंभीर तक्रारींची दखल घेत वैद्यकीय मंत्री यांनी अधिष्ठात्यांना चौकशीचे आदेश देणारे पत्र पाठवले होते. मात्र प्रत्यक्ष चौकशी न करता केवळ कागदावर समिती गठीत करून खोटा व दिशाभूल करणारा अहवाल संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन (DMER) यांच्याकडे पाठवण्यात आल्याचा आरोप गुरुदेव युवा संघाने केला आहे. त्यामुळे शासनाला प्रत्यक्ष परिस्थितीपासून अनभिज्ञ ठेवून रुग्णांच्या यातना लपवण्यात आल्या, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. यवतमाळ शासकीय रुग्णालयात रुग्णांना औषधे वेळेवर मिळत नाहीत, स्ट्रेचरची कमतरता आहे, रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवासाची कोणतीही व्यवस्था नाही. थंडीच्या दिवसांत नातेवाईकांना उघड्यावर राहावे लागत असल्याची विदारक परिस्थिती असून दिव्यांग रुग्णांसाठी यूआयडी केंद्र रुग्णालयातच सुरू करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

तसेच रुग्णांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा उभारण्याचीही आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. या प्रकरणी गुरुदेव युवा संघाने स्पष्ट भूमिका घेतली असून, खोटा अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खातेनिहाय चौकशी, निलंबन, फौजदारी कारवाई तसेच दोषी आढळल्यास शिक्षेची मागणी करण्यात आली आहे. गरज पडल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करून न्यायालयीन अवमानाची कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदन सादर करताना गुरुदेव युवा संघाचे अध्यक्ष मनोज गेडाम, सामाजिक कार्यकर्ता संतोष मनोहर, रुग्णसेवक संघपाल बारसे यांच्यासह संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते. "यवतमाळच्या गोरगरीब रुग्णांना न्याय मिळेपर्यंत गुरुदेवचा लढा थांबणार नाही," अशी ठाम भूमिका संघाने मांडली आहे.

## खो-खो स्पर्धेचे यशस्वी आयोजन

**▸विदर्भ केसरी।**

स्थानिक पी. वाधवाणी फार्मसी महाविद्यालयात इंटर इंजिनियरिंग डिप्लोसा स्टुडन्ट असोसिएशन (एडस्सा) खो-खो एच झोनल टूर्नामेंट अंतर्गत महारास्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, तंत्र शिक्षण संचालनालय प्रादेशिक कार्यालय अमरावती व पी. वाधवाणी फार्मसी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने खो खो स्पर्धेचे यशस्वी आयोजन दिनांक 01/02/2026 रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. ह्या स्पर्धेमध्ये तंत्र शिक्षण संचालनायल प्रादेशिक कार्यालय अमरावती अंतर्गत येणाऱ्या ह्या स्पर्धमध्ये तंत्र शिक्षण संचालनालय प्रादेशिक कार्यालय, अमरावती अंतर्गत येणाऱ्या 24 संस्थेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धकरिता राष्ट्रीयस्तरीय, राज्य स्तरीय तसेच विद्यापीठस्तरीय निवडक 6 पंचांना पाचारण करण्यात आले होते. पंचामध्ये अविनाश जोशी, प्रणय रामटेके,सोनल वानखेडे, काजल जूनोडे, आचल काळे, शितल काळे यांचा सहभाग होता.

कार्यक्रमांची सुरूवात दिनांक 01 फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता झाली. कार्यक्रमाचे यवतमाळ जिल्हा विकास समितीचे अध्यक्ष श्री जगदीशजी वाधवाणी यांनी भूषविले तर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहूणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चांदेवार, पी. वाधवाणी फार्मसी महाविद्यालय, मोहा फाटा, यवतमाळ,प्राचार्य डॉ. मनीषा किटकुले, पि. वाधवाणी फार्मसी महाविद्यालय, गिरीजा नगर, श्रीमती नानकिबाई वाधवाणी कला महाविद्यालय चे डॉ. प्राचार्य जयंत चतुर, श्रीमती नानकिबाई वाधवाणी जुनिअर सायन्स महाविद्यालय च्या प्रचार्या डॉ. संगीता वेनूरकर आणि डी फार्म अभ्यासक्रमाचे विभाग प्रमुख प्रशांत गिरडकर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहूण्यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चांदेवार यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. स्वागत सोहळा महाविद्यालयाच्या मुख्य पटांगणामध्ये पार पडला.

### मुलांवर अल्पवयीनाकडून अत्याचार

नागपूर : समाजमाध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे कोवळ्या वयातील मुले डिजिटली व्यसनांच्या आहारी जात आहेत. माध्यमांवरील रील्सवरून प्रसारित होणाऱ्या मजकुरावर कशाचेही बंधन उरलेले नाही. त्यामुळे चुकीचे मजकूर मुलांच्या हाती पडून त्यांच्यात विविध प्रकारचे न्यूनगंड आणि विक्षिप्त वृत्ती बळावत चालली आहे. अशीच एक धक्कादायक घटना नागपुरात समोर आली. एका अल्पवयीन मुलाने त्याच्याहून वयाने लहान दोन मुलांवर अनैसर्गिक अत्याचार केला. हा प्रकार समोर आल्यावर खळबळ उडाली आहे. वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली.

**महत्त्वाचे**

### अनसिंग येथील अद्विका कॉलेजच्या विद्यार्थिनींची गरुडझेप

**▸विदर्भ केसरी। अनसिंग (प्रतिनिधी):**

ग्रामीण भागातील गुणवत्तेला योग्य वाव मिळाल्यास ती राष्ट्रीय स्तरावरही चमकू शकते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ येथे नुकत्याच संपन्न झालेल्या 'इंटर इंजिनीअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशन' (IEDSSA) झोन-H (अमरावती - नागपूर) विभागीय क्रीडा स्पर्धेत अनसिंग येथील 'अद्विका कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर' च्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत कॉलेजच्या दोन विद्यार्थिनींनी आपल्या क्रीडा कौशल्याच्या जोरावर पदकांची कमाई केली: कु. सारिका गजानन सांगळे: हिने 'थाळी फेक' (Discus Throw) या ताकदीच्या आणि कौशल्याच्या खेळात उत्कृष्ट प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावला. कु. कोमल संतोष भेंडेकर: हिने '१०० मीटर धावणे' या वेगवान शर्यतीत आपल्या चपळाईने तृतीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला.

महाविद्यालयातर्फे गौरव विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल महाविद्यालयात आनंदाचे वातावरण आहे. कॉलेजचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने दोन्ही यशस्वी विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील मुलींनी क्रीडा क्षेत्रात मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण अनसिंग परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. "अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या या मुलींनी मिळवलेले यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस महाविद्यालयाचा पूर्ण पाठिंबा राहील." — महाविद्यालय प्रशासन या यशामुळे विद्यार्थिनींचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत. प्राचार्य

### पैठण तालुक्यात अवैध दारूचा महापूर

**▸विदर्भ केसरी। पैठण :**

तालुक्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीदरम्यान विविध शासकीय यंत्रणा सज्ज झाल्याचे सांगण्यात येत असले तरीही यामध्ये मात्र दारूबंदी विभागाचे अधिकारी-कर्मचारी झोपेचे सोंग घेत असल्याचा प्रकार निदर्शनास येत आहे. तालुक्यामध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती कागदपत्रे शासकीय यंत्रणाकडून देण्यात येत असली तरीही प्रत्यक्ष मात्र तालुक्याचे चित्र अवैधरीत्या दारू विक्रीमुळे विचित्र झाल्याचा प्रकार निदर्शनास येत आहे. निवडणुकीदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी स्थानिक निवडणूक विभागाकडून संबंधित विभागाचे अधिकारी-कर्मचाऱ्यांसह इतर कर्मचाऱ्यांची संयुक्त बैठक घेण्यात आलेली आहे. या बैठकीत कुठल्याही परिस्थितीत निवडणुकीदरम्यान गालबोट लागू नये यासाठी अवैधरीत्या दारू विक्री प्रतिबंध करण्यात येऊन निवडणूक काळात इतर जिल्ह्यांतून येणाऱ्या दारूच्या वाहतुकीचा उपाययोजना करून कारवाई करण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या असतानाही तालुक्यातील विहामांडवा, बिडकीन, लोहगाव, पाचोड, नवगाव, जायकवाडी, पिंपळवाडी, आडुळ, बालानगर, आपेगाव, वडवळी, तुळजापूर, हिरडपुरी, पाटेगाव, दावरवाडी, कातपूर, चितेगाव आदी गावांमध्ये अवैधरीत्या राजरोसपणे दारू विक्री सुरू आहे.

# वन्यप्राण्यांकडुन पीकं फस्त

## बळीराजांच्या डोळ्यात अश्रु: कांदा पिकांचे प्रचंड नुकसान! : अडचणीत भर!

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**

**बाळापूर शेत शिवारातील वाढलेला वन्य प्राण्यांचा सुळसुळाट शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रासदायक ठरत असुन शेती पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे चित्र निदर्शनास येत आहे.**




सध्याच्या परिस्थितीत रब्बी हंगामातील पीक परिस्थिती जवळपास समाधान कारक असल्याचे चित्र दिसत असले तरी वन्य प्राणी पिकांचे नुकसान करीत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडणार असल्याची वस्तुस्थिती निर्माण होत आहे. तर मिळालेल्या माहितीनुसार तालुक्यातील सोनाळा येथील अल्पभूधारक शेतकरी विठ्ठल अमझरे यांच्या शेतातील कांदा पिकांचे रात्रीच्या सुमारास वन्य प्राणी निल गाईंनी मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. शेतकऱ्यांच्या कष्टावर एका रात्रीत पाणी फिरल्याचे अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायक चित्र उघडकीस आले आहे राबराब राबून कडक उन्हात घाम गाळून शेतकरी पीक उभे करतो मात्र अशा प्रकारे एका रात्रीत संपूर्ण मेहनत उध्वस्त होत असल्यास शेतकऱ्यांनी करायचे तरी काय असा गंभीर प्रश्न ? शेतकऱ्यांना भेडसावत आहे कांदा पिकाची नगदी पीक म्हणून समजले जाते त्यावर संपूर्ण कुटुंबाची व्यवस्था अवलंबून असते अशा वेळी झालेले नुकसान केवळ आर्थिक नसून मानसिकदृष्ट्याही शेतकऱ्याला हादरवणारे आहे शासन निर्णयानुसार अशा घटनांची तात्काळ दखल घेऊन पंचनामे करण्यात यावेत आणि संबंधित शेतकऱ्यांना विलंब न करता तातडीची आर्थिक मदत देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचे तत्काळ पंचनामा करून मदत द्यावी तसेच वन्य प्राणी यांचे पासून शेती पिकांचे संरक्षण करण्यासाठी ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात कुंपण अनुदान देखरेख व्यवस्था व प्रतिबंधात्मक उपाय यांची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही तर अशा घटना वारंवार घडत राहतील आणि शेतकरी पूर्णपणे हतबल होईल एका रात्रीत उध्वस्त होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिकांकडे संवेदनशीलतेने पाहीणे ही गरज आहे.

> **■ माझ्या शेतातील कांदा पिकां करीता आंतरमशागतीचा खर्च अधिक प्रमाणात केला त्यामुळे कांदा पिक सध्याच्या परिस्थितीत समाधान कारक होते परंतु वन्य प्राण्यांनी मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. झालेल्या नुकसाना बाबतीत मी वन विभागाकडे तक्रार सादर केलेली आहे मला झालेली नुकसान भरपाई मिळावी अशी अपेक्षा आहे.**
> **-विठ्ठल अमझरे नुकसान ग्रस्त शेतकरी सोनाळा.**

### ३४ जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे राज्यव्यापी आंदोलन दुर्लक्षितच!

**▸विदर्भ केसरी। बुलढाणा:**

जी रामजी ( पूर्वीची मनरेगा) अंतर्गत मागील अनेक वर्षांपासून तुटपुंज्या मानधनावर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मुंबई येथील आझाद मैदानात ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. २ फेब्रुवारीपासून सुरु झालेल्या या आंदोलनात ३४ जिल्ह्यातील हजारो कर्मचारी सहभागी झाले आहेत. मात्र दुसऱ्या दिवशीही हे आंदोलन सरकार लेखी उपेक्षितच ठरल्याने कर्मचाऱ्यात संतप्त प्रतिक्रिया उमटली आहे. यापूर्वी कर्मचाऱ्यांनी मागील २३ जानेवारीपासून असहकार आंदोलन सुरु केले. यामुळे बुलढाण्यासह ३४ जिल्ह्यातील मनरेगाची कामे प्रभावित झाली. मात्र तरीही राज्य शासन व प्रशासनाने आंदोलनाची दखल घेतली नाही. यामुळे २ फेब्रुवारीपासून कर्मचाऱ्यांनी मुंबई येथील आझाद मैदानात ठिय्या मांडला आहे. सध्या राज्यातील २२०० कंत्राटी कर्मचारी यात सहभागी झाले आहे.

## सांगळूदकर महाविद्यालयात भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावर ६ फेब्रुवारीला राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर-**



येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात भारतीय ज्ञान प्रणाली(IKS) या विषयावर दि. ६ फेब्रुवारीला राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, वेद-उपनिषद, योग, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, वास्तुशास्त्र, नैतिक मूल्ये, अध्यात्म आणि जीवनपद्धती या सर्व घटकांचा समावेश असलेल्या भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन, संवर्धन, प्रसार आणि नवीन शिक्षणप्रणालीत प्रभावी समावेश या उद्देशाने या परिषदेस आयोजन करण्यात आलेले आहे.

या राष्ट्रीय परिषदेत देशभरातील विविध विद्यापीठे, संशोधन संस्था व शैक्षणिक क्षेत्रातील नामवंत प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. भारतीय ज्ञानप्रणालीचे आजच्या आधुनिक युगातील महत्त्व, तिचा शिक्षणपद्धतीतील उपयोग आणि भविष्यातील योगदान यावर सखोल चर्चा या परिषदेत होणार आहे.

या परिषदेचे उद्घाटन गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू व मुख्य अतिथी डॉ. श्रीराम कावळे यांच्या शुभहस्ते होणार आहे. या परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर हे भूषविणार आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सी. डी. देशमुख, आजीवन सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था तथा माजी कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व प्राचार्य केशवराव गावंडे, कार्यकारणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती हे उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचे मुख्य वक्ते म्हणून डॉ. रजनीश कौशिक, माजी प्रोफेसर व डीन, गुरुकुल कांगळी विद्यापीठ, हरिद्वार व डॉ. मोनिका ठक्कर, प्रोफेसर, लोककला अकादमी, मुंबई हे देशपातळीवरील तज्ज्ञ मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

**या परिषदेत विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये संशोधन लेख सादरीकरण, चर्चासत्रे, प्रश्नोत्तर सत्र, अनुभव कथन व संवादात्मक व्याख्याने यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना व संशोधकांना आपल्या संशोधन कार्याचे सादरीकरण करण्याची तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळणार आहे.**

सदर राष्ट्रीय परिषदेसाठी आतापर्यंत 360 प्राध्यापक व संशोधक व अभ्यासकांनी नोंदणी केली असून 240 संशोधन पेपर प्राप्त झाले आहेत. या परिषदेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.अतुल के. बोडखे व आयोजन समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

### मंगरूळनाथ शहरातून होणारी गोवंश तस्करी त्वरित थांबवावी.




**▸विदर्भ केसरी।**

गेल्या काही महिन्यापासून शहर तसेच ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणातून गोवंशाची चोरी करून गोवंश कत्तलीसाठी अकोल्याकडे जात आहे अशीच एक घटना दि.३ फेब्रुवारी मंगळवार रोजी सकाळी घडली असता समृद्धी महामार्गावर बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी गोवंश डांबून भरलेले वाहन पोलिसांच्या ताब्यात दिले. मंगरूळ तालुक्यातून मोठ्या प्रमाणात गोवंशाची चोरी होत असून तो गोवंश कत्तल केल्या जात आहे असा आरोपी यावेळी केशव गोरक्षण सेवा समितीने निवेदनाद्वारे ठाणेदार किशोर शेळके यांच्याकडे केला तसेच शहरातील मुख्य रस्त्यावर लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालू करून अशा संशयास्पद वाहतूक करणाऱ्या वाहनांची वेळोवेळी चौकशी करावी व गोवंशाच्या कत्तली ला पूर्णपणे प्रतिबंध घालावा असे आवाहन केशव गोरक्षण चे सहसचिव भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सतीश हिवरकर यांनी यावेळी केले प्रसंगी केशव गोरक्षण सेवा समितीचे अध्यक्ष संतोष बियाणी,सचिव ॲड.बी.एम. ठाकरे,कोशाध्यक्ष गजेंद्र बजाज,गजानन हिवरकर, प्रशांत तळेकर,दिनेश वाघ विकास चौधरी,स्वप्निल निलटकर आदी मान्यवर उपस्थित होते

## मुंबई पोलीस दलातील माजी सहाय्यक आयुक्त तुळशीराम नागरे यांचे निधन

### प्रशासन व सामाजिक क्षेत्रात हळहळ

**▸विदर्भ केसरी। वाशीम (प्रतिनिधी):**



वाशीम तालुक्यातील बाभुळगाव येथील रहिवासी तथा मुंबई पोलीस दलातील माजी सहाय्यक आयुक्त तुळशीराम गणपत नागरे (वय ७२) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पोलीस प्रशासनासह सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

नागरे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात मुंबई पोलीस दलात विविध महत्त्वाच्या व जबाबदारीच्या पदांवर काम करत कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय व प्रामाणिक अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली होती. विशेषतः मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणानंतर राबविण्यात आलेल्या अत्यंत संवेदनशील व आव्हानात्मक मोहिमांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

त्यांच्या नियोजनक्षमतेमुळे व धाडसी निर्णयक्षमतेमुळे अनेक गुंतागुंतीच्या कारवाया यशस्वी ठरल्या. पोलीस दलातील सहकारी अधिकारी व वरिष्ठांमध्ये नागरे यांची कार्यकुशलता, शांत स्वभाव आणि प्रशासकीय शिस्त याबाबत विशेष आदर होता. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत समाजहिताची बांधिलकी जपली. त्यांच्या पश्चात पत्नी, मुली, जावई असा आप्तपरिवार आहे. आज वाशीमजवळील बाभुळगाव या त्यांच्या मूळ गावी शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रशासकीय अधिकारी, पोलीस दलातील अधिकारी, नातेवाईक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तुळशीराम नागरे यांच्या निधनाने एक कर्तव्यनिष्ठ अधिकारी व समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

### नाना पटोलेंचे विश्वासू भाजपमध्ये

**▸विदर्भ केसरी। भंडारा :**

काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे भंडारा जिल्ह्यातील विश्वासू ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष शंकर राऊत यांनी काँग्रेसला रामराम ठोकून सोमवारी २ फेब्रुवारी रोजी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

शंकर राऊत हे केवळ ओबीसी से लचे जिल्हाध्यक्ष नव्हते, तर नाना पटोले यांच्या राजकीय रणनीतीमधील एक महत्त्वाचा दुवा मानले जात होते. हक्काच्या माणसानेच साथ सोडल्याने नाना पटोलेंना हा मोठा राजकीय आणि वैयक्तिक धक्का मानला जात आहे. भाजप नेते परिणय फुके व भाजपा जिल्हा अध्यक्ष आशु गोंडाने यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. परिणय फुके यांनी अत्यंत गुप्तपणे ही राजकीय खेळी यशस्वी केल्याची चर्चा सध्या जिल्ह्यात रंगली आहे.

## जन्म–मृत्यू दाखल्यासाठी आकारली जाणारी फी नगर पंचायतचे शासकीय खात्यात जमा करा –

### नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने नांदगाव खंडेश्वर

**▸विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर ( तालुका प्रतिनिधी )**






नगर पंचायत क्षेत्रात जन्म-मृत्यू दाखल्यासाठी आकारली जाणारी फी शासकीय तिजोरीत जमा करण्याबाबतची प्रक्रिया आणि नियम आहेत.विहित शुल्क संरचना जन्म-मृत्यूची नोंदणी २१ दिवसांच्या आत केल्यास ती मोफत असते मात्र, त्यानंतरच्या विलंबासाठी १ ते १० रुपयांपर्यंत विलंब शुल्क आकारले जाते दाखल्याच्या प्रतिसाठी साधारणपणे नगर पंचायतला शुल्क द्यावे लागते नियमानुसार फी जमा करण्याची पद्धत नगर पंचायत स्तरावर जमा होणारी ही फी महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता नियम, २०११ नुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकृत खात्यात जमा केली जाते.मात्र नगर पंचायत कार्यालयामार्फत नागरिकांना जन्म आणि मृत्यूचे दाखले वितरित केले जातात. जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ नुसार, विहित मुदतीनंतरच्या नोंदणीसाठी किंवा अतिरिक्त प्रतींसाठी ठराविक शुल्क (Fee) आकारले जाते. सध्या नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत कार्यालयात सदर फी संकलनाची प्रक्रिया 'रोख स्वरूपात होत असल्याचे निदर्शनास येत आहे. पारदर्शकता जपण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी ही सर्व फी रक्कम थेट शासकीय महसूल खात्यात (Government Treasury) किंवा नगर पंचायतीच्या अधिकृत बँक खात्यात जमा करण्यात यावी, तसेच नागरिकांना यासाठी 'क्युआर कोड' किंवा 'ऑनलाइन पेमेंट'ची सुविधा उपलब्ध करून दिल्यास शासनाच्या डिजिटल इंडिया मोहिमेला बळकटी मिळेल. जन्म-मृत्यू दाखल्याची फी स्वीकारताना संगणकीय /अधिकृत पावतीच देण्यात यावी.जमा झालेली सर्व रक्कम दररोज शासकीय चलनाद्वारे जमा केली जावी. फीचे दर फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावेत.अशी मागणी सौ.प्रांजली राहुल गुल्हाने नगरसेविका प्रभाग क्रमांक-१४ नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर यांनी एका लेखी अर्जाव्दारे मा.मुख्याधिकारी नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर यांच्या कडे केली असुन अर्जाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

# 'त्या' कृषी सेवा केंद्रांना मार्गदर्शन करा

## कृषी सेवा संचालकांचे तालुका कृषी विभागाला संयुक्त निवेदन

**▸विदर्भ केसरी। शिरजगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर:-**



चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथील कृषी सेवा केंद्र धारकांना युरिया खत विक्री करताना अनेक प्रकारच्या अडचणींच्या समस्यांचा सामोरे जावे लागत आहे.युरिया खत पुरवठा कंपनी,तसेच तांत्रिक अडचणींमुळे कृषी केंद्र धारकांसह शेतकरीही आता अडचणीत सापडला आहे. त्यामुळे शि.कसबा येथील सर्व कृषी केंद्र संचालकांनी तालुका कृषी अधिकारी,चां.बा.यांना युरिया खत विक्री बद्दल मार्गदर्शन करा,असे संयुक्त निवेदन दि.२ ला देण्यात आले आहे.या निवेदनातुन प्रत्यक्ष परिस्थिती व अडचणी समोर आल्या आहे. निवेदनात म्हटल्यानुसार शेतकऱ्यांची युरिया खत मागणीनुसार कृषी केंद्रमध्ये उपलब्ध नाही,त्यामुळे परिसरातील गहू व अन्य पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना गरजेनुसार कृषी केंद्र मध्ये खतपुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांची भटकंती सुरू झाली आहे.पिकाला वेळेवर खत न मिळाल्याने उत्पादनात घट होण्याची भीती निर्माण झाली आहे.अनेक कृषी केंद्रांमध्ये युरिया खताचा माल नाही. सातबारा क्षेत्र पाहून किती रासायनिक खत द्यावे,याबद्दल कृषी अधिकाऱ्यांनी दुकानदारांना मार्गदर्शन द्यावे,अशी मागणी कृषी केंद्र संचालकांनी शासनाला केली आहे. कृषी विभागाने युरिया पुरवठ्याचे योग्य नियोजन, रॅक उपलब्धता,POS प्रणाली यांवर विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

> **तांत्रिक अडचणीमुळे समस्या:निवेदनात नमूद**
>
> **■ निवेदनानुसार,युरिया व डीएपी खत लिंकिंगमध्ये येत असून काही कंपन्या अक्षरशः युरिया कृषी केंद्रांना पाठवताना ट्रक भाडे सुद्धा द्यावे लागत आहे.निर्धारित मूल्यापेक्षा जास्त भावात कृषी केंद्रालाच युरिया खत विकत घेण्याची वेळ आली आहे.तसेच POS मशीन वर अनेक शेतकऱ्यांचे ठसे न जुळणे,मोबाईलही नसतो,ओटीपी चे प्रश्न निर्माण होत आहे.अशामध्ये शेतकऱ्यांना खत विक्री करायची कशी,असा गंभीर प्रश्न कृषी केंद्रांना पडला आहे.**
>
> **■ शिरजगाव कसबा येथील कृषी विक्रेते यांचे निवेदन प्राप्त झाले, त्यांना युरिया खरेदी करताना कंपनी कडून लिंकिंग करण्यात येते, तसेच युरिया चा पुरवठा कमी असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तरी त्यांच्या अडचणी वरिष्ठ कार्यालयाकडे मांडून येत्या २ ते ३ दिवसात खताचा पुरवठा करण्यात येईल अशी ग्वाही देण्यात आली.**
> **- प्रवीण मोहोड**
> **तालुका कृषी अधिकारी, चां.बा.**

## थकबाकीदारांना 'शॉक'

**▸विदर्भ केसरी। अकोला :**

वीजबिल भरण्यास काणाडोळा करणाऱ्या सहा हजारावर थकबाकीदार ग्राहकांना महावितरणने 'शॉक' दिला आहे. अकोला परिमंडळांतर्गत महावितरणने वीजबिल थकबाकीदारांविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली असून वीजबिल भरणार नाही, तर वीजही मिळणार नाही, अशा धोरणाची अंमलबजावणी सुरू केली. वारंवार सूचना देऊनही बिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यातील सहा हजार ३८७ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे, अशी माहिती मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी दिली.

अकोला परिमंडळात वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे महावितरण समोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यातील लघुदाब वर्गवारील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक व इतर वर्गवारीतील ११ लाख ६७ हजार १८२ ग्राहकांकडे जानेवारी महिन्याचे चालू बिल धरून ३४५ कोटी रुपयांची थकबाकी होती. त्यापैकी जानेवारी महिन्यात ११२ कोटी रुपये वसूल झाले आहे. अद्याप २३३ कोटी थकीत आहेत. यात अकोला जिल्ह्यातील चार लाख १६ हजार ३३७ ग्राहकांकडे १२६ कोटी ६३ लाख आहे. वसुली मात्र ४६ कोटी ४५ लाख रुपये, बुलढाणा जिल्ह्यातील पाच लाख २९ हजार ६८२ ग्राहकांकडे १५९ कोटी ७२ लाख एकूण थकबाकी असतांना वसुली ४६ कोटी ३१ लाख रुपये आहे. वाशीम जिल्ह्यातील दोन लाख २१ हजार १६३ ग्राहकांकडे ५८ कोटी ७९ लाख रुपयांची थकबाकी असतांना जानेवारी महिन्यात केवळ १८ कोटी ९५ लाख रुपये वसूल झाले.

## भंडाऱ्यात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**भंडारा :** जिल्ह्यातील नोकरीइच्छुक युवक व युवतींकरीता पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करून त्यांना खाजगी क्षेत्रातील नामांकित कंपन्याच्या माध्यमातून अधिक मागणी असलेल्या क्षेत्रात रोजगार उपलब्ध करून दिला जातो. त्या अनूषंगाने, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र भंडारा, यांच्या तर्फे दिनांक 03 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी. 3.00 या वेळेत या कार्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय विशेष रोजगार मेळावा संपन्न झाला. सदर रोजगार मेळाव्यामध्ये 04 नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. त्यांचेमार्फत एकूण 75 रिक्तपदांकरीता उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. सदर मेळाव्यात एकूण 87 उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यामध्ये पुरूषांची संख्या 42 व महिलांची संख्या 45 इतकी आहे. 65 उमेदवारांनी प्रत्यक्ष आणि 22 उमेदवारांनी गुगलफॉर्मद्वारे नोंदणी केली होती. सदर रोजगार मेळाव्यात 65 उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थिती दर्शविली होती. त्यापैकी 65 उमेदवारांनी मुलाखती दिल्या आहेत. त्यापैकी 17 उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. सदर रोजगार मेळाव्याच्या उद्घाटनीय कार्यक्रमात उद्घाटक तथा प्रमूख अतिथी म्हणून वि.मा. पांडव कौ.वि.रो. व मार्गदर्शन अधिकारी, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र भंडारा, आशालता वाल्दे क.कौ.वि.मार्गदर्शन अधिकारी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

# बोगाटोला जंगलातील 'त्या' अज्ञात खुनाचा 72 तासांत छडा

## पाच आरोपी अटकेत सहा दिवसांची पोलीस कोठडी, प्रेमसंबंधातून रक्तरंजित कट ..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : तालुक्यातील कोटरा -बोगाटोला मार्गावरील जंगल परिसरात अर्धवट पुरलेल्या अवस्थेत सापडलेल्या अज्ञात इसमाच्या मृत्यू प्रकरणाचा गडचिरोली पोलिसांनी अवघ्या 72 तासांत उलगडा करत पाच आरोपींना अटक केली आहे. मृतदेह पूर्णतः कुजलेल्या अवस्थेत असल्याने मयताची ओळख पटविणे तसेच गुन्ह्याचा तपास करणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरले होते. मात्र पोस्टे कोरची व स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्तपणे केलेल्या तपासामुळे हा गंभीर गुन्हा उघडकीस आला. 31 जानेवारी 2026 रोजी बोगाटोला जंगलात एका अज्ञात इसमाचा मृतदेह अर्धवट पुरलेल्या अवस्थेत आढळून आला होता. मृतदेहाचा चेहरा कुजलेला असल्याने ओळख पटविणे अशक्य झाले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोस्टे कोरची व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळावरील पुरावे, तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरु केला.

तपासादरम्यान वैद्यकीय अहवालात मयताचा मृत्यू मानेवर धारदार शस्त्राने वार केल्याने झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर 02 फेब्रुवारी 2026 रोजी पोस्टे कोरची येथे मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपासात मृत व्यक्तीची ओळख जितू कवंर (वय 30), रा. जेठकन्हार, ता. डोंगरगड, जि. राजनांदगाव (छत्तीसगड) अशी निष्पन्न झाली. दरम्यान तपासात असे उघड झाले की, आरोपी शानु पठाण (रा. जांभूळखेडा, ता. कुरखेडा) याचे मयताच्या पत्नीसोबत प्रेमसंबंध होते. या संबंधात जितू कवंर अडसर ठरत असल्याने आरोपीने पूर्वनियोजित कट रचला. जितू कवंर हा खुर्शीपार (ता. कोरची) येथे आलेला असताना आरोपी व त्याच्या साथीदारांनी धारदार शस्त्राने मानेवर वार करुन त्याचा खून केला व पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह जंगलात नेऊन अर्धवट पुरुन ठेवला.

या प्रकरणी आरोपी शानु पठाण (वय 36), पुंकेश बोरकर (वय 32), चंद्रशेखर गुज्जेवार (वय 27), धनपाल मडावी (वय 21), सर्व रा. जांभूळखेडा, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली तसेच सोनाली कवंर (वय 25), रा. जेठकन्हार,



ता. डोंगरगड , जि. राजनांदगाव (छ.ग.) यांना 04 फेब्रुवारी 2026 रोजी अटक करण्यात आली. सर्व आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोस्टे कोरचीचे पोलीस निरीक्षक शैलेंद्र ठाकरे करीत असून, ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली व पोस्टे कोरचीच्या पथकाने संयुक्तपणे पार पाडली.

# सीईओ संजीता महापात्र यांनी धामणगाव रेल्वे येथे ऐकल्या तक्रारी

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी बुधवारी, ४ फेब्रुवारी रोजी धामणगाव रेल्वे पंचायत समितीत नागरिकांच्या तक्रारी ऐकल्या. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या तक्रारी दोन आठवड्यांत निकाली काढण्याचे निर्देश दिले.



जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तालुका स्तरावर जनता दरबार आयोजित करून नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण करावे, असे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी नुकत्याच झालेल्या जिल्हा नियोजन समिती (DPC) बैठकीत दिले होते. त्यानुसार, सीईओ महापात्र यांनी संपूर्ण आठवडाभराचा कृती कार्यक्रम निश्चित केला असून, त्याचा शुभारंभ आज धामणगाव रेल्वे येथून करण्यात आला. सीईओ संजीता महापात्र यांनी धामणगाव रेल्वे पंचायत समितीच्या सभागृहात नागरिकांशी संवाद साधला. यावेळी नागरिकांनी घराजवळील अतिक्रमण, घरकुलासारख्या वैयक्तिक समस्यांसह गायरान जमिनीचा गैरवापर यांसारख्या सार्वजनिक हिताच्या मुद्द्यांवरही तक्रारी मांडल्या. सीईओ येणार असल्याची माहिती ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांमार्फत तालुक्यात आधीच पोहोचवण्यात आली होती. त्यामुळे कामनापूर घुसळी, बोरगाव धांदे, देवगाव आदी गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापात्र यांनी त्यांच्या अधिनस्थ अधिकाऱ्यांच्या समक्ष नागरिकांचे प्रश्न समजून घेतले आणि दोन आठवड्यांत ते सोडवण्याचे निर्देश दिले. यावेळी धामणगाव रेल्वेचे गटविकास अधिकारी प्रफुल्ल भोरखडे आणि पंचायत समिती स्तरावरील इतर अधिकारी उपस्थित होते. जनता दरबार आटोपल्यानंतर, सीईओ महापात्र यांनी अधिकाऱ्यांकडून विविध विकास कामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव आणि स्थानिक पातळीवरील समस्यांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी कावली वसाड आणि ढाकुळगाव येथे भेट देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची पाहणी केली.

# इ-केवायसीमुळे अडकलेल्या महिलांना दिलासा

## तीन महिन्यांचा निधी आता एकत्रित मिळणार

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**



ई-केवायसीमध्ये चुकीची माहिती सादर केल्यामुळे मानधनापासून वंचित राहिलेल्या महिलांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने घेतलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयामुळे नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यांचा हप्ता पात्र महिलांच्या बँक खात्यात थेट जमा केला जाणार आहे. यामुळे अनेक महिलांना एकत्रित निधी मिळणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या या योजनेत जिल्ह्यातील सुमारे ७ लाख महिलांनी अर्ज केले होते. त्यांचे प्रस्ताव मंजूर होऊन त्यांना गेल्या काही महिन्यांपासून नियमितपणे पैसे मिळत होते. मात्र, शासनाने ई-केवायसीची अट घातल्यानंतर अनेक अडचणी निर्माण झाल्या. यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदत दिली होती. बहुसंख्य महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली, परंतु काही महिलांकडून चुकीची माहिती भरली गेल्याने त्या अपात्र ठरल्या. यामुळे त्यांना नोव्हेंबरपासून रक्कम मिळाली नव्हती. या पार्श्वभूमीवर, शासनाने चूक दुरुस्त करण्याची संधी दिली आहे. ज्या महिलांनी दुरुस्ती करून स्वतःला पुन्हा पात्र करून घेतले आहे, त्यांना आता तीन महिन्यांची एकत्रित रक्कम दिली जाईल. या योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपयांची आर्थिक मदत थेट जमा केली जाते, ज्यामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला हातभार लागतो. मदत अचानक बंद झाल्याने अनेक महिलांनी महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयांमध्ये चौकशीसाठी गर्दी केली होती. ई-केवायसी करताना संबंधित महिलांना वडील किंवा पतीच्या आधारकार्डची प्रत जोडण्यास सांगितले होते. परंतु, ज्या महिला विधवा आहेत, त्यांना पतीचे आधारकार्ड जोडणे शक्य नव्हते. तसेच, ज्या अविवाहित महिलांचे वडील हयात नाहीत, त्यांना वडिलांचे आधारकार्ड जोडता आले नाही. यामुळे त्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. अशा महिलांना आता स्वयंघोषणापत्राच्या आधारे पुन्हा संधी देण्यात आली आहे. ज्यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांनाही पूर्ववत लाभ दिला जाईल.

# नवस फेडण्यासाठी निघालेल्या कुटुंबावर घाला

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

नवस फेडण्यासाठी आनंदाने जाणाऱ्या एका कुटुंबावर काळाने घाला घातला आहे. पुसद-उमरखेड रोडवरील महावीर नगरजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने ॲपे ऑटो पलटी होऊन झालेल्या भीषण अपघातात १० वर्षीय चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात तिची आई गंभीर जखमी झाली असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. ही हृदयद्रावक घटना मंगळवारी ३ फेब्रुवारीला दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास घडली. दिपाली अतुल सुरोशे वय १० वर्ष रा. शिवाजी वार्ड, पुसद असे मृत चिमुकलीचे नाव आहे. तर सपना सतीश सुरोशे असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे.



या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पुसद येथील शिवाजी वार्डात राहणारे सुरोशे कुटुंब उमरखेड तालुक्यातील पळशी गावाजवळील मनुला येथे सटवाई देवीची यात्रा व नवस फेडण्यासाठी जात होते. सतीश बंडू सुरोशे (२२) हा आपला ऑटो क्रमांक एम-२५-एन-३१३५ घेऊन जात असताना, महावीर नगरजवळील वळणावर अचानक पुढे आलेला खड्डा चुकवत असतांना त्यांचा ऑटोवरचे नियंत्रण सुटले आणि ऑटो पलटी झाला. यात उजव्या बाजूला बसलेली दिपाली ऑटोखाली दबली गेली. तिच्या डोक्याला आणि मेंदूला गंभीर दुखापत झाल्याने तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताचा आवाज होताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली आणि जखमींना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सपना सुरोशे यांची प्रकृती गंभीर आहे. या घटनेची माहिती मिळताच पुसद शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

# बनावट मिठाईच्या कार-खान्यावर पोलिसांची धाड

यवतमाळ : अन्न व औषध प्रशासन विभागाची रवानगी न घेताच वनस्पती तेल, दूध पावडर आणि साखरेपासून खवा (कुंदा) तयार करण्यात येत असलेल्या फॅक्टरीमध्ये गोपनीय माहितीच्या अधारे कारवाई करत फॅक्टरीला सील ठोकण्यात आले आहे. ही कारवाई अन्न व औषधी प्रशासन विभागाने लोहारा परिसरात असलेल्या एमआयडीसी मध्ये सोमवारी २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास करण्यात आली आहे. या कारवाईमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. एमआयडीसी परिसरात बनावट खवा तयार करण्यात येत असल्याची माहिती काही सामाजीक कार्यकर्त्यांनी पोलिस व अन्न, औषधी प्रशासन विभागाला दिली. लोहारा ठाणेदार रोहीत चौधरी आणि अन्न सुरक्षा अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. सवाई सिंग राज पुरोहित यांच्या मालकीच्या डी. के. बेकरी अँड नमकीन नावाच्या फॅक्टरीमध्ये तपासणी करण्यात आली असता खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी आवश्यक असलेली कुठलेही परवाने आढळुन आले नाही.

# बंद उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीला केंद्र सरकारची मंजुरी प्रक्रिया सुरू


**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अमरावती शहरातील राजकमल आणि जयस्तंभ चौकातून रेल्वे स्टेशन तसेच काँग्रेसनगरकडे जाणाऱ्या सर्वात जुन्या रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचा विषय केंद्र सरकारच्या मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग यांनी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली.

शहरातील हा सर्वात जुना रेल्वे उड्डाणपूल गेल्या २५ ऑगस्टपासून सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. यामुळे शहराच्या इतर रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी होत असून नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे त्याचे बांधकाम तत्काळ सुरू केले जावे, अशी मागणी समाजाच्या सर्वच घटकांकडून पुढे आली आहे.

रेल्वे राज्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा विषय तांत्रिकदृष्ट्या बडनेरा-अमरावती विभागातील किमी ६७१/१४-१५ येथे असलेल्या जुन्या रेल्वे ओव्हर ब्रिज (आरओबी) च्या पुनर्बांधणीसंदर्भातील आहे. हा दोन पदरी आरओबी सन १९६३ मध्ये बांधण्यात आला होता. राज्य प्रशासनाने नेमलेल्या त्रयस्थ संस्थेने केलेल्या संरचनात्मक सुरक्षा मुल्यांकन अहवालाच्या (स्ट्रक्चरल ऑडिट) आधारे, प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गेल्या पंचवीस ऑगस्टपासून या उड्डाणपुलावरील सर्व प्रकारची वाहतूक बंद केली आहे.

रेल्वे मंत्रालयाने या सर्वात जुन्या रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीचे काम अजेंड्यावर घेतले असून ते सध्या मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला गती दिली जाईल. याच मुद्द्यावरून खासदार बळवंतराव वानखडे पुढील आठवड्यात रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेणार आहेत. दरम्यानच्या काळात अमरावतीत रेल्वे स्टेशन सुमारे एक किलोमीटर पुढे नेण्याचा पर्याय पुढे आणण्यात आला होता. मात्र, या प्रस्तावामागे रेल्वे स्टेशनची जमीन काही खाजगी विकासकांच्या घशात घालण्याचा डाव असल्याचे लक्षात येताच, हा प्रस्ताव मागे घेण्यात आला. आता सरकारने पुलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतल्याने रेल्वे स्टेशनचे स्थानांतर जवळपास टळले आहे. खासदार बळवंतराव वानखडे यांनी त्यावेळीच रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना भेटून याबाबतची हमी प्राप्त करून घेतली होती.



## संक्षीप्त



### चौथीसाव्या बौद्ध धम्म परिषदेत देवेंद्र खडसे यांना धम्म पुरस्काराने सन्मानित

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

पुसद : दिनांक 2 व 3 फेब्रुवारी 2026 ला वटफळी तालुका नेर येथे महाबोधी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पिता रामजी सुभेदार स्मृतिदिनानिमित्त, दरवर्षीप्रमाणे भव्य धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सामाजिक व धम्मकार्य करणाऱ्या उपासकांना धम्मभूषण, समाज भूषण पुरस्कार देण्यात येतो. संस्थेचे अध्यक्ष भदंत डॉक्टर नागघोश महाथेरो व त्यांचे सर्व आयोजक समितीच्या वतीने यावर्षीच्या धम्म परिषदेमध्ये, पुसद येथील महाबोधी बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष, फुले शाहू आंबेडकर फाउंडेशन पुसदचे अध्यक्ष, पुसद पंचायत समितीचे माजी सदस्य, आयुष्यमान देवेंद्र अंबादासजी खडसे यांना धम्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. स्थानिक उपासक उपासिकांकडून त्यांचे याबद्दल भरभरून अभिनंदन केल्या जात आहे.



### नाविण्यापुर्ण उपक्रम राबवून परसोडा ग्राम पंचायत नाव लौकिकास प्राप्त -मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : बबिता शिवणकर**

आर्णी : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ह्या महाराष्ट्र शासनाने हाती घेतलेल्या उपक्रमात अनेक ग्रामपंचायत ने सहभाग नोंदविला परंतु नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून स्पर्धेत आपले वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या परसोडा ग्रामपंचायतची जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी पाहणी केली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायत ने स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला. गाव खऱ्या अर्थाने समृद्ध करणे करिता महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविले आहे ह्यात तालुक्यातील परसोडा गावाची तयारी कश्या पद्धतीने चालू आहे ह्याचे पाहणी करणे करिता व घरकुल लाभार्थी यांचे भूमिपूजन करिता जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की आले असताना गावातील नाविण्यापुर्ण उपक्रम याची पाहणी करून परसोडा गाव जिल्हास्तरीय पुरस्कार चे स्पर्धेत असून अश्याच प्रकारची तयारी करावी असे ग्रामस्थांना सांगितले. प्राथमिक मराठी शाळा जिल्हा परिषद चे विध्यार्थी यांनी लेझीम पथका द्वारे पत्की साहेबांचे स्वागत करण्यात आले.ह्यावेळी आर्णी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रमेश खारोडे, विस्तार अधिकारी इंगोले, ठाकरे, बघेल यांची प्रमुख उपस्थिती होती तर सरपंच प्रा सौ स्वप्ना अतुल देशमुख, माजी सरपंच अतुल पाटील देशमुख, उपसरपंच सुनंदा पत्रे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर राठोड, अजाब पत्रे, मंगला चौधरी, जिप शाळेचे मुख्याध्यापक बाबाराव वानखडे, नारायण वेट्टी यासंह महिला बचत गटाचे सदस्य, ग्रामस्थ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### गडचिरोलीच्या क्रीडा वैभवात मानाचा तुरा! 'स्पंदन स्पोर्ट्स' चमूचे दिमाखदार यश

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : ब्रह्मपुरी हॉकी असोसिएशनद्वारे आयोजित 'आमदार चषक' राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत (२६ ते ३० जानेवारी) आपल्या गडचिरोलीच्या 'स्पंदन स्पोर्ट्स' चमूने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय पारितोषिक पटकावले आहे. ही जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. या यशाबद्दल आज गडचिरोली येथील 'कर्तव्य कक्ष क्रमांक १' कार्यालयात या युवा खेळाडूंचे जंगी स्वागत व अभिनंदन करण्यात आले. गडचिरोलीतील ग्रामीण भागात गुणवान खेळाडूंची कमतरता नाही, त्यांना योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाल्यास ते राज्यच नव्हे तर देशपातळीवर जिल्ह्याचे नाव उंचावू शकतात, याचा प्रत्यय या खेळाडूंनी दिला आहे. सर्व यशस्वी खेळाडूंचे, त्यांच्या प्रशिक्षकांचे आणि चमुचे मी मनापासून अभिनंदन करतो व त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस शुभेच्छा देतो. खेळाडूंच्या प्रगतीसाठी आणि क्रीडा सुविधांच्या विकासासाठी मी सदैव पाठिशी उभा आहे. असे आमदार डॉ. मिलिंद नरोटे गडचिरोली विधानसभा क्षेत्र यांनी यावेळी म्हटले आहे.

### अतुल म्हशाखेत्री यांचे निधन



अडपल्ली (गोगाव) येथील प्रतिष्ठित नागरिक श्री. उमाकांतजी पा. म्हशाखेत्री यांचा मुलगा अतुल उमाकांत म्हशाखेत्री आज बुधवार, दिनांक 04/02/2026 ला आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उद्या गुरुवार, दि. 05/02/2026 ला सकाळी 11.00 वाजता अंतिम संस्कार करण्यात येणार आहे.

दैनिक विदर्भ केसरी | TODAY
गडचिरोली
GOOD MORNING

## पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर २८ हजार रुपयांची रोकड हिसकावली

पुण्यात गणेशखिंड रस्त्यावरील वीर चापेकर चौकात एटीएममधून पैसे काढून बाहेर पडलेल्या एका तरुणाला मारहाण करून २८ हजार रुपयांची रोकड लुटण्यात आली. ही घटना १ जानेवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली असून, याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कसबा पेठेत राहणारा ३२ वर्षीय तक्रारदार तरुण आणि त्याचा मित्र श्री म्हसोबा मंदिराजवळील एटीएममधून पैसे काढून निघाले होते. त्याचवेळी दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांना अडवले. चोरट्यांनी शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. या झटापटीत तरुणाच्या खिशातील २८ हजार रुपयांची रोकड हिसकावून चोरटे पसार झाले. सहायक पोलीस निरीक्षक पांढरे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. शहरात पादचाऱ्यांना धमकावून त्यांच्याकडील रोकड, मोबाईल हिसकावून नेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. तसेच, पादचारी महिलांकडून दागिने हिसकावण्याचे प्रकारही वाढले आहेत. यापूर्वी नगर रस्त्यावर बसची वाट पाहत थांबलेल्या एका तरुणाला पुणे स्टेशनपर्यंत सोडण्याची बतावणी करून मोटारचालक आणि त्याच्या साथीदारांनी लुटल्याची घटना नुकतीच घडली होती. दरम्यान, कर्वे रस्त्यावर पादचारी ज्येष्ठ महिलेचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची आणखी एक घटना समोर आली आहे. या प्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संक्षीप्त



### जिमलगट्टा येथील अंगणवाडी केंद्रात अरुनोदय सिकलसेल अंनेमीया विशेष अभियान तपासणी शिबीर संपन्न

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अहेरी : अहेरी तालुक्यातील जिमलगट्टा अंगणवाडी क्र. १ येथे आज अरुनोदय अनेमीया विशेष तपासणी अभियान राबवण्यात आले, यावेळी वय ० ते ४० वर्ष व योगटातील महिला व पुरुष बालक, बालिका सिकलसेल तपासणी करण्यात आले आहे. या वेळी एकूण १०२ नागरिकांना तपासणी करण्यात आले आहे. या अरुनोदय सिकलसेल अनेमिया विशेष तपासणी अभियात प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी सुलोचना चिलनकर, आरोग्य सहाय्यिका रजनी वासनिक, आरोग्य सेविका मखनलाल मार्गीया, आरोग्य सेविका सरीता गावडे, अंगणवाडी सेविका मंजुषा वेलादी, सरीता पानेम, सरीता डुरके, आशा वर्कर मारिका कांबडे, अंगणवाडी मदतनीस ज्योती पानेम, आदी उपस्थित होते.

### सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांचा दौरा : 'कोया कृषी कुंभ' महोत्सवाच्या उद्घाटनासह विविध विकासकामांचा घेणार आढावा

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



गडचिरोली : राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय आणि कामगार राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल गुरुवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते विविध शासकीय कार्यक्रमांना उपस्थित राहणार असून जिल्हयातील महत्त्वाच्या विभागांच्या कामाचा आढावा घेणार आहेत. त्यांच्या दौऱ्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. दिनांक ५ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.०० वा. 'कोया कृषी कुंभ २०२६' या कार्यक्रमास सोनापूर येथील कृषी महाविद्यालय प्रांगणात उपस्थिती, दुपारी १.०० वा. जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे दिव्यांग प्रमाणपत्र एकत्रित वितरण कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी २.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयात गडचिरोली जिल्ह्यातील 'पाणंद रस्ते' संदर्भातील आढावा बैठक. दुपारी ३.३० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व पणन महासंघ विभागाची आढावा बैठक. संध्याकाळी ४.०० वा. गडचिरोली नगर परिषदेत नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांची भेट आणि नगर परिषदेच्या कामाची आढावा बैठक. सायं ५ वा. रामटेककडे प्रयाण.



### जोगीसाखरा येथे भव्यदिव्य डान्स स्पर्धेचा जल्लोषात शुभारंभ

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

आरमोरी : आरमोरी तालुक्यातील मौजा जोगीसाखरा येथे आयोजित भव्यदिव्य डान्स स्पर्धेचे उद्घाटन मोठ्या थाटात, जल्लोषात आणि प्रचंड उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते भोलुभाऊ सोमनानी होते, तर उद्घाटन माजी आमदार आनंद गेडाम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या रंगतदार कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांनी मंचाची शोभा वाढवली. यामध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वास भोवते, आरमोरी नगर परिषदेचे नगरसेवक भारत बवनथडे, अरुण हर्षे, बंटी खडसे, रामदास डोंगरवार यांच्यासह कार्यक्रमाचे आयोजक संदीप ठाकूर, सरपंच तथा शिवसेना जिल्हा प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. डान्स स्पर्धेदरम्यान तरुणाईचा उत्साह, प्रेक्षकांचा जल्लोष आणि टाळ्यांच्या कडकडाटाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील कलागुणांना व्यासपीठ मिळते, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून आयोजनाचे कौतुक केले.

### राज्य सरकारने गडचिरोली जिल्ह्यात स्वतंत्र कर्करोग निदान रुग्णालय निर्माण करावे..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



गडचिरोली : गडचिरोली जिल्हा महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकावर बसलेला अतिदुर्गम, उद्योग विरहित जिल्हा आहे या जिल्ह्यामध्ये आरोग्य निदान हा विषय अतिशय मागासलेला आहे. या जिल्ह्यातील शेकडो लोक कर्करोग निदानासाठी हजारो रुपये खर्च करून अन्य जिल्ह्यामध्ये जाऊन उपचार करतात परंतु जिल्ह्यात कर्करोग निदान करण्यासाठी कर्करोग निदान रुग्णालय नसल्याने सर्व कर्करोग ग्रस्त गोरगरीब, शोषित, वंचित गडचिरोली जिल्ह्यातील तमाम नागरिकांना कर्करोग निदान गडचिरोली जिल्ह्यातच व्हावे याकरिता गडचिरोली जिल्ह्यातच स्वतंत्र कर्करोग निदान रुग्णालय निर्माण व्हावे ही मागणी आहे. याकरिता राज्याचे मुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी केली. तसेच कर्करोगाचे वेळीच निदान आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत समाजात व्यापक जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. या आजाराशी झुंज देणाऱ्या रुग्णांना केवळ वैद्यकीय उपचारांचीच नव्हे, तर आपल्या सामाजिक पाठबळाची आणि मानसिक आधाराचीही नितांत आवश्यकता असते. आपण सर्वजण मिळून कर्करोगमुक्त भविष्यासाठी प्रयत्नशील राहूया आणि सुदृढ जीवनशैलीचा अंगीकार करण्याचा दृढ संकल्प करूया. व गडचिरोली जिल्ह्याला अधिक सक्षम व सुदृढ बनवूया असे प्रतिपादन डॉ. प्रणय खुणे प्रदेश अध्यक्ष राष्ट्रीय मानवाधिकार संघटना यांनी केले.

# हर घर जल पाणीपुरवठा योजनेत झालेल्या कामाची चौकशी करून दोषीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी

## ग्रामपंचायत घोट येथील प्रकार : डॉ. प्रणय खुणे प्रदेशाध्यक्ष राष्ट्रीय मानवाधिकार संघटना!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

चामोर्शी / घोट : पंचायत समिती चामोर्शी अंतर्गत गट ग्रामपंचायत घोट येते केंद्र शासनाच्या जनजीवन मिशन अंतर्गत हर घर जल पाणीपुरवठा योजनेसाठी 22 कोटी रुपये खर्च करण्यात आले परंतु एवढा मोठा निधी खर्च होऊन सुद्धा सदर योजना आजपर्यंत प्रभावीपणे कार्यान्वित झाली नाही व येथील नागरिकांना शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात पायपीट करावी लागत आहे. त्याचप्रमाणे नवीन नळ कनेक्शन देताना अनेक घरापर्यंत थेट कनेक्शन न देता अर्धवट स्वरूपात जोडणी करण्यात आलेली आहे. गावातील विविध वार्डामध्ये नळ जोडणी साठी करण्यात आलेल्या खोदकामामुळे गावातील रस्त्याची अवस्था खूप दैनिय झालेली आहे. पाणीपुरवठासाठी वापरण्यात येणारे वाल्व रस्त्यावर उघड्यावर असल्याने अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून नागरिकांच्या दैनंदिन रहदारी साठी सुद्धा खूप मोठा अडचणी निर्माण झाला आहे ग्रामस्थांनी सदर काम पूर्ण व दर्जेदार झाल्याशिवाय प्रमाणपत्र देऊ नये अशी हरकत ग्रामपंचायत मध्ये नोंदवून सुद्धा काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र ग्रामपंचायतीने कोणत्या आधारावर दिले याची सुद्धा चौकशी होणे नितांत आवश्यक आहे गट ग्रामपंचायत घोट अंतर्गत कर्दूळ , निकतवाडा, पेठ व नवेगाव समाविष्ट असून या सर्व गावातील नागरिकांना जलजीवन मिशन अंतर्गत शुद्ध पिण्यासाठी पाणी पुरवठा टाकी उभारण्यात आले परंतु सदर पाणीपुरवठा योजना आज पर्यंत सलग एक महिना देखील चालली नाही व सदर पाणीपुरवठा योजना घोट वासियांसाठी पांढरा हत्ती ठरलेला आहे. या पाणीपुरवठा योजनेची चौकशी करून शासनाने तात्काळ लक्ष देऊन कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रणय खुणे , जिल्हाध्यक्ष रमेश अधिकारी, जिल्हा जिल्हा कार्याध्यक्ष आसिफ सैय्यद जिल्हा उपाध्यक्ष नानू उपाध्ये, माजी जिल्हा परिषद सदस्य नामदेव सोनटक्के, मानवाधिकार संघटन जिल्हा कार्याध्यक्ष आसिफ सय्यद, अविनाश पाटील, माजी पोलीस पाटील, रमेश शृंगारपवार, अश्विनी वडेट्टीवार, रूम्पा शहा, पवन दुधवावरे, विलास उईके, विलास वडेट्टीवार, दिनेश मुजुमदार, ललिता कागदलवार विवेक खांडेकर, सुशीला आत्राम स्थानिक घोट



येथील नागरिकांनी प्रधानमंत्री कार्यालय नवी दिल्ली, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, ग्रामविकास मंत्री. पाणीपुरवठा मंत्री, मा, खासदार. मा, आमदार, महोदय व मुख्य कार्यकारी अधिकारी गडचिरोली व अभियंता जल जीवन मिशन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा गडचिरोली यांना आपल्या तक्रार निवेदनाद्वारे केली आहे.

## जागतिक कर्करोग दिनानिमित्त गडचिरोली सामान्य रुग्णालयात आरोग्य तपासणी व जनजागृती

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**




गडचिरोली : "कर्करोगासारख्या गंभीर आजारावर वेळीच निदान आणि उपचार झाल्यास त्यावर यशस्वीपणे मात करणे शक्य आहे. समाजात या आजाराबद्दल असलेली अनाठायी भीती दूर करून जनजागृती करणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. छाया उईके यांनी केले. जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून, जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नि यंत्रण कार्यक्रम, सामान्य रुग्णालय गड चिरोली येथे आरोग्य तपासणी व ज नजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी गुलाबी रिबन लावून जनजागृती करण्यात आली. तज्ज्ञांचे आवाहन आणि मार्गदर्शन* या प्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा लहाडे यांनी नागरिकांना आवाहन केले की, "शरीरात कर्करोगाचे कोणतेही लक्षण आढळल्यास किंवा शंका आल्यास भीती न बाळगता त्वरित तज्ज्ञांकडून तपासणी व निदान करून घ्यावे. वेळेवर घेतलेला निर्णय जीव वाचवू शकतो."

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांनी यावेळी सांगितले की , "कर्करोगाचे जर सुरुवातीच्या टप्प्यात (Early Detection) निदान झाले, तर हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. अत्याधुनिक उपचार पद्धतीमुळे आपण रुग्णाला उत्तम आणि दर्जेदार जीवन देऊ शकतो, त्यामुळे नागरिकांनी तपासणीसाठी पुढे यावे."

प्रमुख मार्गदर्शक बाह्य वैद्यकीय अ धिकारी डॉ. बागराज धुर्वे यांनी कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे, तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम आणि प्रतिबंधात्मक उपाय यावर सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले.

आरोग्य तपासणी व प्रबोधन कार्यक्रमादरम्यान रुग्णालयात येणाऱ्या ना गरिकांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून आ रोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने खालील विषयांवर विशेष भर देण्यात आला: मौखिक कर्करोग (Oral Cancer) स्तनाचा कर्करोग (Breast Cancer) गर्भाशयाचा कर्करोग ( C e r vical Cancer) मा न्यवरांची उपस्थिती_

या प्रसंगी व्यासपीठावर डॉ. माधुरी की लनाके, डॉ. इंद्रजीत नागदेवते, डॉ. म नी ष मेश्राम, डॉ. मनीषा गेडाम, डॉ. चं द्रशेखर शानगोंडा,डॉ. अमित साळवे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. अनुपम मैशगौरी, डॉ. सरोज कुथे, डॉ. मृणाली रामटेके, डॉ. दिनेश रोकडे, मेट्रन आशा बावणे आणि मंजू मधू यांसह आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल कं कनालवार, राहुल चावरे, संदीप मो टघरे, विजय सिडाम तसेच राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## ५ फेब्रुवारीपासून गडचिरोलीत कोया कृषी कुंभ महोत्सव

### शेतक-यांसाठी समृद्ध शेतीचे नवे दालन खुले

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**




गडचिरोली : जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेती तंत्रज्ञान, बाजारपेठेतील संधी आणि कृषिपूरक व्यवसायाचे नवे मार्ग उघडणारा कोया कृषी कुंभ२०२६ महोत्सव गडचिरोली येथे आयोजित करण्यात आला आहे. हा भव्य कृषी महोत्सव गुरुवार ५ फेब्रुवारीपासून ९ फेब्रुवारीपर्यंत शासकीय कृषी महाविद्यालयाच्या पटांगणात पार पडणार आहे. गडचिरोली कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व राज्य शासनाच्या कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये शेतमाल विक्री मेळावा, खरेदीदार-विक्रेता संमेलन, परिसंवाद, चर्चासत्रे तसेच शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देण्यात येणार आहे.

गडचिरोली कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) व राज्य शासनाच्या कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये शेतमाल विक्री मेळावा, खरेदीदार-विक्रेता संमेलन, परिसंवाद, चर्चासत्रे तसेच शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच नगराध्यक्षा ॲड. प्रणोती निंबोरकर, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, पोलीस अधीक्षक निलोत्पल, विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे यांच्यासह अनेक मान्यवर या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.

या महोत्सवात विविध चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रिती हिरळकर यांनी केले आहे. कोया कृषी कुंभ २०२६ हा महोत्सव गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी समृद्ध आणि आधुनिक शेतीकडे वाटचाल करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण मंच ठरणार आहे.

**नामवंत तज्ज्ञांचे मार्गदर्शन**

- या कृषी कुंभमध्ये राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आदर्श गाव कार्यक्रमाचे कार्यकारी संचालक पोपटराव पवार, बीजमाता राही पोपेरे, कृषी पर्यटनाचे जनक पांडुरंग तावेरे, सुप्रसिद्ध शेफ विष्णु मनोहर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. देवाजी तोफा, नागपूर येथील कॉलेज ऑफ फिशरी सायन्सचे सहाय्यक प्रा. श्यामकांत शेळके, मधमाशी तज्ज्ञ आनंद जक्कूलवार यांच्यासह अनेक मान्यवर विविध विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

## सांगलीत मुलासमोरच वडिलांचा दगडाने ठेचून खून, तिघे ताब्यात

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

सांगलीतील इनाम धामणी रोडवर शनिवारी मध्यरात्री एका बाप-लेकावर हल्ला करत मुलाच्या समोरच वडिलांना दगडाने ठेचून ठार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कीर्तिकुमार शेडबाळे (५०) असे हत्या झालेल्याचे नाव आहे, तर हल्ल्यामध्ये मुलगा जखमी झाला आहे. जखमी मुलावर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या हल्ल्यानंतर पळून जाणाऱ्या संशयित हल्लेखोरांना संतप्त जमावाने पकडून बेदम चोप देत पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

या घटनेची नोंद विश्रामबाग पोलिस ठाण्यामध्ये झाली असून नेमका कोणत्या कारणातून खून झाला,हे स्पष्ट होऊ शकले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, कीर्तिकुमार शेडबाळे हे आपल्या मुलासह दुचाकीवरून इनाम धामणी परिसरातील कच्च्या रस्त्यावरून जात होते. या वेळी रस्त्याच्या कडेला बसलेल्या तीन संशयित व्यक्तींशी त्यांचा किरकोळ वाद झाला. हा वाद क्षणातच विकोपाला गेला. संतप्त झालेल्या संशयितांनी बाप-लेकावर अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात कीर्तिकुमार शेडबाळे यांच्या डोक्यात दगड घालून त्यांना जागीच ठार मारण्यात आले, तर मुलालाही मारहाण करण्यात आली. वडिलांचा खून मुलाच्या समोरच झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली होती. सांगली शहरातील वाढत्या गुन्हेगारीमुळे स्थानिकांमध्ये कमालीचा संताप व्यक्त होत आहे. अशा घटनांमुळे सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घटनेची माहिती मिळताच विश्रामबाग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि संशयितांना ताब्यात घेतले. प्राथमिक माहितीनुसार, हे तिन्ही हल्लेखोर नशेत होते का, याचाही तपास पोलिस करत आहेत.

## श्रीराम विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी चमकले

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : नुकताच घेण्यात आलेल्या तहसील विभाग, उपविभागीय परिवहन विभाग गडचिरोली व आदिवासी मुलांचे वस्तीगृह कुरखेडा तर्फे घेण्यात आलेल्या वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, व गीत गायन स्पर्धेत श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा येथील विद्यार्थी प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करून यशाची परंपरा कायम राखत विद्यालयाचा व स्वतःचा नावलौकिक केला आहे. आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्था कुरखेडा व्दारा संचालित श्रीराम विद्यालय तथा श्रीराम कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय कुरखेडा येथे येथील प्राचार्य, नागेश्वर फाये व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनोद नागपूरकर यांच्या मार्गदर्शनात आयोजित केलेल्या विविध स्पर्धेत विद्यार्थी उत्तुंग भरारी घेत आहेत. कुरखेडा तहसील विभागामार्फत घेण्यात आलेल्या माय इंडिया माय वोट या निबंध स्पर्धेत व रांगोळी स्पर्धेत क्रमांक प्राप्त करणारा श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी विष्णू लक्ष्मण गायकवाड व द्वितीय क्रमांक रविना हरिदास कुंजाम, व रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक इसीका संघपाल बोदेले, तृतीय क्रमांक कावेरी बंडू बोरकर यांनी पटकावले आहे. सोबतच आदिवासी मुलांच्या वस्तीगृह येथे वार्षिक संमेलन निमित्त आयोजित खुल्या वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक विष्णू गायकवाड यांनी प्राप्त केला तर गीत गायन स्पर्धेत विधी भास्कर बनसोड हीने प्रथम क्रमांक प्राप्त केले आहे. तर उपविभागीय पर्यावरण विभाग आरटीओ यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्त श्रीराम विद्यालयातील विद्यार्थी यांनी चित्रकला व निबंध व वक्तृत्व स्पर्धेत प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक प्राप्त केले आहे सोबतच पोलीस विभाग कुरखेडा तर्फे घेण्यात आलेल्या मराठी भाषा पंधरवाडा निमित्त आयोजित निबंध स्पर्धेमध्ये प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे अशा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना, प्रशस्तीपत्र सन्मानचिन्हे व रोख रक्कम देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे यावेळी आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे चे कोष वअध्यक्ष तथा शाळा समिती अध्यक्ष वामनराव फाये, संस्था सचिव दोषहरराव फाये, शाळा समिती सदस्य चांगदेव फाये व संस्थेचे पदाधिकारी व श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी प्राध्यापक व प्राध्यापिका यांनी या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा अभिनंदन केला आहे.








# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**